# घनकचरा व्यवस्थापन

कचरा व सार्वजनिक आरोग्य यांचा जवळचा संबंध आहे. कच-याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करुन योग्य प्रकारे विल्हेवाट न लावल्यास आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता असते. आणि म्हणुनच कच-याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करुन त्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे ही जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर सोपविण्यात आलेली आहे.

शहरी व ग्रामीण अशा दोन्ही भागात कचरा निर्माण होतो. परंतू ग्रामीण भागात निर्माण होणा-या कच-याची विल्हेवाट लावण्याकरीता मुबलक जागा उपलब्ध असते. ग्रामीण भागात निर्माण झालेल्या कच-याची विल्हेवाट घरामागील जागेत लावून त्यापासुन खत निर्माण करतात व त्याचा वापर शेती करीता करतात.

शहरात मात्र वाढती लोकसंख्या, औद्योगिकीरण, राहणीमानात पडलेला फरक, कच-याचे विविध प्रकार यामुळे नगरपालिका /महानगरपालिकांच्या पुढे शहरी भागातील कच-यांचा प्रश्न हाताळणे, त्यांचे व्यवस्थापन करणे, साठवणुक, वाहतुक करणे व विल्हेवाट लावणे ह्या गोष्टी प्रशासकीय यंत्रणेसमोर समस्या म्हणून उभ्या आहेत.

## *I) घनकचरा व्यवस्थापन संदर्भातील सध्या अस्तित्वात असणारे काही नियम / कायदे*

१) *मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६३(२) व (४)* नुसार शहरातील सर्व सार्वजनिक रस्ते व जागा यावर पाणी शिंपडणे, त्यांचे झाडलोट व साफसफाई करणे आणि तेथून केरकचरा काढून नेणे, नाले सफाई व जलनिसा:रणाची कामे आणि सार्वजनिक शौचालय, मुता-या व तत्सम सोयी बांधणे, सुस्थितीत ठेवणे व त्यांची साफसफाई करणे, मलजन्य दुर्गंधीयुक्त पदार्थ व कचरा गोळा करणे, काढुन नेणे, त्याची निचरा व्यवस्था व विल्हेवाट लावणे ही महानगरपालिकांची बंधनकारक कर्तव्ये आहेत.

२) केंद्रशासनाने पर्यावरण मंत्रालयामार्फत एक तज्ञ समिती नेमून घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात सखोल अभ्यास करुन त्यानंतर सन २००० साली घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात कायदा / नियम तयार केले आणि त्यास '*नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २०००*' असे संबोधले आहे.

३) नागरीकांच्या प्लॅस्टीक पिशव्यांच्या बेसुमार वापरामुळे, तसेच ओढे,गटारी येथे कचरा फेकण्याच्या नागरीकांच्या सवयीमुळे सन २००५ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत गटारे, ओढे तुंबले आणि

नागरीकांना पुराचा त्रास सहन करावा लागला. ते पाहुन महाराष्ट्र शासनाने कचरा व्यवस्थापन संबंधी एका अध्यादेशानुसार नियम केले त्याला '*महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण ) अध्यादेश २००६* ' असे नाव दिले असून ते मार्च २००६ पासुन अंमलात आले.

४) प्लॅस्टिकच्या पिशव्यांच्या बेसुमार वापरावर नियंत्रण आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ' महाराष्ट्र प्लॅस्टिक कॅरी बॅग्ज (उत्पादन व वापर) नियम २००६ (Maharashtra Plastic Carry Bags (Manufacturing & Usage ) Rules, 2006) हा नियम अंमलात आणला आहे.

५) घनकच-यांमध्ये 'जैव वैद्यकिय ' कच-याचा सुध्दा समावेश असतो. अशा प्रकारच्या कच-याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट न लावल्यास नागरी आरोग्यास गंभीर धोका निर्माण होतो ही बाब लक्षात घेवून केंद्र शासनाने या प्रकारच्या जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापनासाठी पर्यावरण कायद्याअंतर्गत एक नविन कायदा / नियम तयार केला आहे. त्यास 'Bio Medical Waste (Handling & Management) Rule 1998' म्हणुन संबोधले जाते. त्यात केलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यासाठी सुचना दिल्या आहेत.

### *II) महानगरपालिकेने स्वच्छता विषयक कामकाजासाठी प्रभागवार कर्मचारी नियुक्त केलेले आहेत, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे :-*

***अ,ब,क,ड प्रभागातील कर्मचा-यांची पदनिहाय माहिती.***

| अ.क्र | पदनाम | अ | ब | क | ड | मुख्यालय | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक आरोग्य अधिकारी | १ | १ | १ | १ | ६ | १० |
| २ | मुख्य आरोग्य निरिक्षक | ३ | ३ | २ | २ | १ | ११ |
| ३ | आरोग्य निरिक्षक | ८ | ७ | ९ | ७ | १ | ३२ |
| ४ | वाहन चालक | ८+८ | ७+७ | १०+९ | ७+५ | १ | ६२ |
| ५ | आरोग्य सहाय्यक | २ | ६ | ४ | ४ | ० | १६ |
| ६ | मुकादम | १६ | १३ | २१ | १८ | १ | ६९ |
| ७ | गटर कुली | ६० | ११५ | ७७ | ९३ | ० | ३४५ |
| ८ | झाडूवाल्या, सफाई कामगार | २०७ | २६४ | २६१ | २८० | ४ | १०१६ |
| ९ | सफाई सेवक | ६८ | ९७ | ८२ | ७३ | ० | ३२० |
| १० | कचरा कुली | ४५ | ३२ | ४० | ३० | ० | १४७ |
| ११ | मजुर | ९ | ६ | ७ | ९ | ० | ३१ |
| १२ | स्प्रे कुली | ९ | ३ | १५ | १६ | ० | ४३ |
| १३ | कंपोस्ट कुली | ० | ० | ३ | ० | ० | ३ |
| १४ | शिपाई | ० | ० | ० | २ | ० | २ |
| १५ | मेंटेन्स हेल्पर | ० | ० | १ | ० | ० | १ |
|  | एकुण | ४४४ | ५६१ | ५४२ | ५४७ | १४ | २१०८ |

महापालिकेचे स्वच्छता काम आठवड्यातील सातही दिवस चालू असते. त्यामुळे २० टक्के रजा राखीव कर्मचारी लागतात. त्यानुसार कामकाज व्याप्तीचे वर्कलोडच्या मानाने कर्मचारी कमी आहेत. त्यामुळे काही भागातील काम खाजगीकरणाव्दारे करुन घेतले जात आहे.

## *III) महानगरपालिका कार्यक्षेत्रात निर्माण होणा-या कच-याच्या उत्पत्तीची स्थाने :-*

१) घरगुती कचरा

२) व्यावसायिक स्थाने म्हणजे ऑफिसेस व दुकाने, हॉटेल्स व उपहारगृहे, भाजीमंडई, औद्योगिक, रस्त्यावरील कचरा इत्यादी.

३) बांधकाम व्यवसायापासून निर्माण होणारा राडारोडा, डेबरिज.

४) रुग्णालयातील कचरा.

५) औद्योगिक संस्थांमधून निर्माण होणारा कचरा.

**घनकचरा पृथःकरण :-**

| अ.क्र. | फिजीकल पॅरामीटर | टक्केवारी (%) |
|---|---|---|
| १ | ऑरगॅनिक मॅटर | ५४ |
| २ | पेपर | ३.३० |
| ३ | रबर, लेदर, सांथेटिक | ०.१० |
| ४ | प्लास्टीक % | १.९० |
| ५ | क्लॉथ्स % | १.७० |
| ६ | ग्लास % | ०.५० |
| ७ | मेटल % | ०.२० |
| ८ | इनर्ट मॅटर | ३८.३० |
| ९ | इतर | - |
| **एकुण** | | १०० |

| अ.क्र. | केमीकल पॅरामीटर | व्हॅल्यु | युनिट |
|---|---|---|---|
| १ | डेनसिटी | ५२८.० | {H$.J«°./KZ_rQ>a |
| २ | ग्रॉस कॅलोरीफीक व्हॅल्यु | ८५०.० | {H$.H°$./{H$.J°«. |
| ३ | पी.एच. | ७.१० | - |
| ४ | इलेक्ट्रीकल कनडक्टव्हीटी | ४.५० | _o.hmo_./go._r. |
| ५ | टोटल वॉटर सोल्युब सॉईल्ड्स | ५६.९८ | _r.J°«./J«°_ |
| ६ | लॉस ऑन इग्नीशन | ४९.९८ | % |
| ७ | मॉईश्चर | ४३.३१ | % |
| ८ | ऑरगॅनिक कार्बन | २६.४१ | % |
| ९ | ऑरगॅनिक मॅटर | ४५.०६ | % |
| १० | टोटल नायट्रोजन | १.१८ | _r.J«°./J«°_ |
| ११ | सी / एन रॅटिओ | २२.१५ | -- |
| १२ | टोटल फॉस्परस | २०.०३ | _r.J«°./J«°_ |
| १३ | टोटल पोटॅशिअम | १८.८० | _r.J«°./J«°_ |
| १४ | झिंक | ०.१९ | _r.J°«./J«°_ |
| १५ | क्रोमिअम | ०.११ | _r.J°«./J«°_ |
| १६ | क्रोमिअम /सी.डी. | ०.०७ | _r.J°«./J«°_ |
| १७ | मरक्युरी | एन.डी. | _r.J°«./J«°_ |

स्त्रोत -हुडकोने तयार केलेल्या डी.पी.आर.

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, ऑरगॅनिक मॅटरचे प्रमाण जास्त आहे. तसेच पेपर व प्लॉस्टीकचे प्रमाण मात्र कमी आहे.

यावरुन असे दिसते की मनपाचे आरोग्य निरीक्षक व उपद्रव शोध पथकामार्फत प्लॅस्टिक विरोधी मोहीम यशस्वी झाली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालू असल्याने अविघटनशिल कच-याचे प्रमाण मात्र वाढले आहे.

## *IV) घनकचरा व्यवस्थापन*

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाचे कामकाज अ,ब,क,ड प्रभाग कार्यालया मार्फत चालते. व या चारही प्रभाग कार्यालयात दैनंदिन साफसफाई करण्याकरिता

स्वतंत्र यंत्रणा उभारली आहे. या चार प्रभाग कार्यालयांच्या क्षेत्रामधुन प्रतिदिनी अंदाजे एकूण ६००-६५० मेट्रीक टन कचरा निर्माण होतो. याचाच अर्थ प्रतिदिनी प्रत्येक माणसी ३५० ते ४०० ग्रॅम कचरा निर्माण होतो.

या घनकच-याचे व्यवस्थापन पुढील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

१. साफसफाई करणे, रस्ते स्वच्छ करणे, उघडी गटर्स/नाले स्वच्छता करणे.

२. घरोघरचा कचरा जमा करणे

३. कच-याचे अलगीकरण (वर्गीकरण) करणे.

४. साफसफाई कामातुन निघालेला कचरा कुंडीमध्ये साठा करणे.

५. कचरा वाहतुक करणे.

६. कचऱ्यावर प्रक्रिया करणे, कच-याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे.

७. व्यवस्थापन कार्यप्रणाली व जनजागरण.

## *१. साफसफाई करणे :-*

### *प्रतिदिनी साफसफाई करणे :-*

महानगरपालिकांना त्यांच्या हद्दीतील सर्व सार्वजनिक रस्ते, गल्लीबोळ व ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरी वसाहत व मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण होतो अशा ठिकाणची साफसफाई रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही करण्यात येते. ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरी वसाहत नाही त्या ठिकाणी दिवसाआड किंवा आठवड्यात दोन वेळा आवश्यकतेनुसार सफाई कर्मचा-यांना काम नेमून देवून त्यांच्याकडून सफाईचे काम करवून घेण्यात येते. रविवार व सार्वजनिक सुट्टयासह दररोज साफसफाईची कामे करून घेण्यात येतात. त्यामुळे सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सर्व दिवशी साफसफाई करून घनकच-याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्यात येते. प्रत्येक कर्मचा-यांना काम करणेची ठिकाणे ठरवुन दिलेले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कार्यरत आहेत. त्याठीकाणी कमी प्रमाणात कचरा निर्माण होत असल्याने यापुर्वी आठवड्यात दोन दिवस त्या ठिकाणची साफसफाई करुन घेण्यात येत होती परंतु सध्या त्या ठिकाणीसुध्दा प्रतिदिनी साफसफाई करुन घेण्यात येत आहे. मनपात एकुण १०१६ कर्मचारी रस्ते साफसफाईसाठी आहेत तर गटर सफाईसाठी ३४५ कर्मचारी व संडास, मुतारी साफ करण्यासाठी ३२० कर्मचारी आहे.

## *कामाची वेळ :-*

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत साफसफाईच्या कामासाठी सकाळी ७ ते २ अशी कामाची वेळ असल्यामुळे कर्मचा-यांचे दुपारचे वेळेतील अनुपस्थितीतेचे प्रमाण कमी झाले.  कर्मचा-यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे सोयीस्कर झाले आहे. त्यामुळे कामाचा वेग वाढला आहे.

## *कामाचे निश्चित ठिकाण :-*

प्रत्येक सफाई कर्मचा-याला त्यांच्या कामाची निश्चित ठिकाण ठरवुन दिलेली आहे. त्या त्या भागातील साफसफाईची जबाबदारी संबंधित कर्मचा-यांवर देण्यात आली आहे. निश्चित भागातील साफसफाई धोरणामुळे कर्मचा-यास जबाबदार धरण्यात येवू लागले. त्यामुळे शहर स्वच्छ राहणेस मदत झ्‌ााली आहे.

## *कामाचे क्षेत्र :-*

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्षेत्रात एकुण ११३० कि.मी. लांबीचे रस्ते असुन रस्ते झाडणा-या कर्मचा-यांना प्रतिदिनी प्रती कर्मचारी १२०० रनिंग मिटर रस्त्याची साफसफाई करण्याची जबाबदारी ठरवुन दिली आहे. महापालिका क्षेत्रात एकुण ११३० कि.मी.लांबीचे रस्ते आहेत.्अ,ब,क,ड प्रभागनिहाय असलेले रस्ते खालील प्रमाणे.

| **प्रभाग** | **३० फुट पर्यंत रुंदीचे रस्ते (र.मी)** | **३० पेक्षा जास्त रुंदीचे रस्ते (र.मी)** | **एकुण रस्ते लांबी (र.मी.)** |
|---|---|---|---|
| अ | १६४४२० | १६९२३१ | ३३३६५१ |
| ब | १२७८८२ | ५५१७४ | १८३०५६ |
| क | १९५७३० | ६०३०० | २५६०३० |
| ड | १९८९४२ | १५८१४१ | ३५७०८३ |
| **एकुण** | **६८६९७४** | **४४२८४६** | **११२९८२०** |

सदर रस्ते साफ करण्यासाठी एकुण १३१० सफाई कर्मचारी + २०% रजा राखीव २६२ असे एकुम १५७२ सफाई कर्मचा-यांची आवश्यकता आहे.

सध्या रस्त्यांची साफसफाई करणेकरिता म.न.पाने १०१६ सफाई कामगारांची नेमणुक केलेली आहे. सदर कर्मचा-यांना कामाचे निश्चित क्षेत्र ठरवुन दिल्यामुळे कामातील दिरंगाई व हलगर्जीपणा कमी होण्यास मदत होते. याशिवाय कर्मचारी कमी असल्याने बाहेरील स्वंयरोजगार संस्था मार्फत काही कर्मचारी घेवुन रस्ते सफाईचे काम करणेत यते.

## ६) *सफाईसाठी साहित्य साधने :-*

सफाई कर्मचा-यांना साफसफाईकामी विविध साधने दिली जातात. त्याची माहिती खालील प्रमाणे.

**खराटे :-** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये साफसफाई कर्मचा-यांना प्रतिमाह दोन खराटे पुरविण्यात येतात. खराटयांचा वापर करुनच साफसफाई करणेत येते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरात झाडलोटीचे काम बहुतांशी स्त्री कर्मचारीच करीत असल्याने लांब बांबुला खराटा बांधुन साफसफाई करणेची त्यांना सवय नाही. परंतु आता त्यांना हळु हळु बांबु झाडुच्या साहाय्याने सफाई करण्यास प्रवृत्त केले जात आहे. त्यामुळे त्यांची कार्यक्षमता निश्चित वाढेल.

***फावडे व शॉवेल्स :-***

उघडी गटर्स फावडे/सळई फावडे यांच्या सहाय्याने साफ केले जातात. त्यातील निघालेला कचरा शॉवेल मार्फत ढकलगाडीत भरुन वाहुन नेला जातो.

***ढकलगाडी :-*** पिंपरी चिंचवड महानगरपालिका साफसफाई कर्मचा-यांना कचरा गोळा करणेसाठी झाडू व घमेली उपलब्ध करून दिलेले आहेत. प्रत्येक साफसफाई कर्मचा-याला कचरा गोळा करून घमेल्यात भरुन कचराकुंडीत नेऊन टाकावा लागतो. घमेल्यात खुप कमी कचरा बसत असल्याने कामासाठी बराच वेळ लागतो व कर्मचा-यांची कार्यक्षमता कमी होते. त्यासाठी या कर्मचा-यांना हातगाडी देणेबाबत शिफारस करणेत आली होती. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील साफसफाई झाडलोट करण्या-या कर्मचा-यांना हातगाडी दिलेल्या आहेत. त्यामुळे कर्मचारी सार्वजनिक स्थळाची साफसफाई करुनझालेला कचरा एकत्रित आणून तेथेच जाळत असलेचे दिसून येते. त्यामुळे वायुप्रदूषण होते. तथापि, कर्मचा-यांना (झाडलोट कामगारांना ) सुध्दा हातगाडी दिल्यास सदर कर्मचा-यांमार्फत साफसफाई / झाडलोट करून

कचरा एकत्रित करुन तो न जाळता त्यांना दिलेल्या हातगाडीत टाकुन त्यांना ठरवून दिलेल्या जागी टाकण्यात येत आहे. त्यामुळे कचरा जाळण्याचे प्रकार कमी होवून होणारे वायु प्रदुषण कमी होण्यास मदत होते आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्यात मदत होत आहे.

### *ठेकेदारी पध्दतीने रस्ते सफाई, गटरसफाई करणाऱ्याची संस्थांची व प्रभागनिहाय यादी*

साफसफाईकामी मानांकापेक्षा कर्मचारी कमी असल्याने चारही प्रभागात काही प्रमाणात खाजगीकरणाव्दारे साफसफाईची कामे पार पाडली जातात. प्रभागनिहाय या कामी पुढील प्रमाणे ठेकेदार/संस्था नेमले आहेत.

| **प्रभाग** | **ठेकेदार/संस्थांची संख्या** |
|---|---|
| अ | १३ |
| ब | ११ |
| क | १४ |
| ड | ७ |
| **एकुण** | **४५** |

### *तांत्रिक स्वच्छता (मेकॅनिकल स्विपिंग )*

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मनुष्यबळावर होणाऱ्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी रस्त्यांची तांत्रिक साफसफाई करण्याचे ठरविले आहे. जे.एन.एन.यु.आर.एम. चा योजनेअंतर्गत रस्त्यांची तांत्रिक साफसफाई करण्याकरिता मनपाने एक मोठा तांत्रिक रस्ता साफसफाई करणारी मशिन खरेदी केली आहे. मशिनने रस्ता साफ करण्याकरिता मशिनचे वेळापत्रकही ठरविण्यात आले आहे. ज्यामध्ये मशिनचा दिवस व जागा ठरविण्यात आले आहे. जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत दोन लहान तांत्रिक साफसफाई मशिन खरेदी करण्यासाठीचा आदेश देण्यात आलेला आहेत. दोन लहान तांत्रिक मशिन ही खाजगी ठेकेदारास खरेदी करण्यास लावुन त्या त्यांना चालवा व देखभाल या तत्वावर पाच वर्षासाठीचा करार करण्यात आलेले आहे.

## रस्ते साफ करणाऱ्या मशिनद्वारे (रोड स्विपर) रस्ते साफसफाईच्या साप्ताहिक कार्यक्रमाची प्रभागनिहाय माहिती

| अ.क्र | प्रभाग | | रस्ते सफाई ठिकाण कोठुन कोठेपर्यंत | अंतर कि.मी | रस्ते स्वरुप | एकुण कि.मी. | वार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ प्रभाग | १ | दुर्गादेवी उद्यान गेट ते भक्ती शक्ती चौक | २ १/२ | चारपदरी रोड | १२ | सोमवार |
| | | २ | निगडी जकात नाका ते निगडी उड्डान पुल उतारा पर्यंत दोन्ही बाजुस सर्व्हिस रोडसह | १ | आठपदरी रोड | ८ | |
| | | ३ | लोकमान्य हॉस्पिटल ते म्हाळसाकांत चौक ते आकुर्डीगाव ते शितलादेवी मंदिर ते मुंबई पुणे रोड | २ | दोनपदरी | ४ | |
| | | ४ | टिळक पुतळा ते लोकमान्य हॉस्पिटल | १ | चारपदरी | ६ | |
| २ | ब प्रभाग | १ | बॅक ऑफ महाराष्ट्र मुंबई पुणे रोड ते मनपा भवन ते खराळवाी ते कलासागर हॉटेल ते नाशिक फाटा पर्यंत संपुर्ण महामार्ग गेट सेपरेटसह | ४ | आठपदरी | ३२ | मंगळवार |
| | | २ | पिंपरी डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते पिंपरी रेल्वे उड्डाण पुल संपूर्ण ते शगुन चौक | १ १/२ | दोनपदरी | ३ | |
| | | ३ | संत तुकाराम एस टी स्टँड ते वल्लभनगर ते महेशनगर ते यशवंतराव टेल्को रत्यापर्यंत | ४ | चारपदरी | १६ | |
| ३ | अ प्रभाग | १ | निगडी लोकमान्य टिळक पुतळा ते यमुनानगर ते दुर्गानगर कॉर्नर ते थरमॅक्स चौक ते एच डी एफ सी कॉलनी ते के एस बी चौक | ४१/२ | चार + आठपदरी | ३४ | बुधवार |
| | | २ | संभाजीनगर परिसर अंतर्गत रस्ते | ५ | एकपदरी | १० | |

| अ.क्र | प्रभाग | | रस्ते सफाई ठिकाण कोठुन कोठेपर्यंत | अंतर कि.मी. | रस्ते स्वरुप | एकुण कि.मी. | वार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३ | संत तुकाराम एस टी स्टँड ते वल्लभनगर ते महेशनगर ते यशवंतराव टेल्को रत्यापर्यंत | ४ | चारपदरी | १६ | |
| ३ | अ प्रभाग | १ | निगडी लोकमान्य टिळक पुतळा ते यमुनानगर ते दुर्गानगर कॉर्नर ते थरमॅक्स चौक ते एच डी एफ सी कॉलनी ते के एस बी चौक | ४१/२ | चार + आठपदरी | ३४ | बुधवार |
| | | २ | संभाजीनगर परिसर अंतर्गत रस्ते | ५ | एकपदरी | १० | |
| | | १ | के एस बी चौक ते राका गॅस एजन्सी | ५ | एकपदरी | १० | गुरूवार |
| | | २ | मुंबई पुणे रोड ते ॲटोक्लस्टर ते बसवेश्वर चौक | ४ | एकपदरी | ८ | |
| | अ ब | १ | के एस बी चौक ते आर टी ओ ते कुदळवाडी उतारा पर्यंत | २ | चारपदरी | ८ | |
| ४ | अ ब प्रभाग | २ | के एस बी चौ ते अण्णासाहेब पाटील पुतळा ते आयुक्त निवास ते पिंपरी कोर्ट | ३ | दोन पदरी | ६ | |
| | | ३ | किशोर पंप ते सी के गोयल स्कुल | १ | दोन पदरी | २ | |
| | | ४ | खंडोबा माळ चौक ते रेल्वे उड्डाण पुल ते एस के एफ कंपनी पर्यंत | २ | चारपदरी | ८ | |
| | | | | | | ४२ | |
| ५ | क प्रभाग | १ | पांजरपोळ ते मोशी गाव टोल नाका | ५ | चारपदरी | २० | शुक्रवार |
| | | २ | नाशिक फाटा ते भ ोसरी | ५ | चारपदरी | २० | |
| | | ३ | भोसरी ते पांजरपोळ नाशिक रोड | ३ | चारपदरी | १२ | |
| | | | | | | ५२ | |
| ६ | | १ | निगडी भक्ती शक्ती चौक ते निगडी जकात नाका ते निगडी उड्डाण पुल पर्यंत | २ | चारपदरी | ८ | रविवार |
| | | २ | बॅक ऑफ महाराष्ट्र मुंबई पुणे रोड ते मनपा भवन ते खराळवाडी ते कलासागर हॉटेल ते नाशिक फाटा | ४ | चारपदरी | ३२ | |
| | | ३ | संभाजीनगर परिसर | ५ | एकपदरी | १० | |
| | | | | | | ५० | |

### *म.न.पा. कर्मचारी व ठेकेदारामार्फत रस्ते सफाई करण्यात येणाऱ्या क्षेत्राची प्रभागनिहाय माहिती*

| अक्र | प्रभाग | रस्ते क्षेत्र | | रोड स्विपर मार्फत रस्ते सफाई क्षेत्र | | म.न.पा. कर्मचाऱ्यामार्फत साफ करावयाचे क्षेत्र | | ठेकेदारामार्फत साफ करावयाचे क्षेत्र | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० फुटापर्यंत रूंदीचे | ३० फुटापेक्षा जास्त रूंदीचे | ३० फुटापर्यंत रूंदीचे | ३० फुटापेक्षा जास्त रूंदीचे | ३० फुटापर्यंत रूंदीचे | ३० फुटापेक्षा जास्त रूंदीचे | ३० फुटापर्यंत रूंदीचे | ३० फुटापेक्षा जास्त रूंदीचे |
| १ | अ | ५५९३३९ | ५७७७८२ | ६२०० | १०२५०७ | २७०३५३ | ३४७४४२ | २८२७८६ | १२७८३३ |
| २ | ब | ५७३६४४ | २७८४६८ | १९५० | ४३७१८ | ३०३४२८ | १६६२४० | २६८२६६ | ६८५१० |
| ३ | क | १२१८४३७ | ५१२६६३ | - | २५५१९३ | ४६८४५१ | ६६२३५ | ७४९९८६ | १९१२३५ |
| ४ | ड | ८३८७७४ | ३३७३४८ | - | ३०७६३ | ४५८९२८ | ८३८७८ | ३७९८४६ | २२२७०७ |
| एकुण | | ३१९०१९४ | १७०६२६१ | ८१५० | ४३२१८१ | १५०११६० | ६६३७९५ | १६८०८८४ | ६१०२८५ |

## *गटारे साफसफाई :-*

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये गटारांची एकुण लांबी ५,३२,५०४ रनिंग मी असुन सदर गटारे साफ करणेसाठी ३४५ गटर कुलींची कायम स्वरुपी नेमणुक करणेत आली आहे. व त्यांना ठराविक क्षेत्र देणेत आले आहे. त्यामुळे गटारे साफसफाईचे कामाचा वेग वाढला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर्मचा-यामार्फत प्रतिदिनी प्रती माणसी १००० रनिंग मीटर गटर साफसफाई करण्यात येते. महापालिकेच्या काही भागात भुयारी गटरयोजना कार्यान्वित असली तरी काही भागात अद्यापही उघडी गटर्स आहेत. त्यांची प्रभागनिहाय लांबी पुढील प्रमाणे :-

### *प्रभागनिहाय गटारांची लांबी माहिती देणारा तक्ता*

| प्रभाग | गटर लांबी (मीटर्स) |
|---|---|
| अ | १९३०८२ |
| ब | ८९४७० |
| क | १३२००५ |
| ड | ११७९४७ |
| **एकुण** | **५३२५०४** |

### *प्रभागनिहाय नाल्यांची संख्या व नाल्यांची लांबी माहिती देणारा तक्ता*

| प्रभागाचे नाव | नाल्यांची संख्या | नाल्यांची लांबी मी. |
|---|---|---|
| अ | ३२ | १४३०६ |
| ब | २६ | १४२४४ |
| क | ३२ | २४१३२ |
| ड | २६ | २०७९० |
| **एकुण** | **११६** | **७३४७२** |

सदर नाल्यांची सफाई वर्षातुन २ वेळा करून घेतली जाते. नाल्यांमधुन निघणारा कचरा, गाळ, मोशी येथील कचरा डेपोत टाकला जातो.

## *नालेसफाई :-*

अ प्रभागात लहान मोठे मिळुन ३२ नाले ब प्रभागात २६ नाले क प्रभागात ३२ नाले ड प्रभागात २६ असे एकुण ११६ नाले आहेत. दरवर्षी पावसाळ्यापुर्वी काही नाले ठेकेदारी पध्दतीने व काही नाले मनपा कर्मचा-यामार्फत साफ करून घेतली जात आहे. नाल्याची यादी सोबत जोडलेली आहे.

## *अ प्रभाग नाल्यांची यादी*

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण |
|---|---|
| प्रभाग क्रमांक १ | |
| १ | तळवडे गांव पीरबाबा माऊली नाला |
| २ | घाटजाई मंदिर ते त्रिवेणीनगर |
| ३ | देहुरोड कॅन्टोमेन्ट हद्द ते घाटजाई मंदिर |
| प्रभाग क्रमांक २ | |
| ४ | साने चौक ते चिखली ओढ्यापर्यंत |
| ५ | प्राधिकरण सेक्टर नं २७ स्त्री आधार केंद्राजवळील नाला |
| ६ | अप्पुघर ते पवळे यांचे घरापर्यंत |
| ७ | मदनलाल धिंग्रा मैदानाजवळील नाला |
| ८ | वाहतुक नगरीमधील पी सी एम टी नाला |
| ९ | निगडी टी सी आय गेट ते पी सी एम टी गेट |

| | |
|---|---|
| १० | सेक्टर २३ प्रकाशगढ सोसायटी कच्चा नाला |
| **प्रभाग क्रमांक १९** | |
| ११ | साईनाथ नगर ते माता अमृतानंदमयी मठ नाला |
| १२ | साईनाथ नगर ते विटभट्टीकडे जाणारा नाला |
| १३ | सेक्टर नं २२ ५७६ गाळ्याजवळील नाला |
| १४ | श्रीकृष्ण मंदिर ते टिळक चौक |
| **प्रभाग क्रमांक १९** | |
| १५ | स्वेद बिंदू सोसायटीजवळील नाला |
| **प्रभाग क्रमांक २१** | |
| १६ | टिळक चौक ते प्रकाश कॉलनी |
| १७ | प्रकाश कॉलनी ते धनश्री हॉटेल |
| १८ | धनश्री हॉटेल ते कालीका बिल्डींग |
| **प्रभाग क्रमांक २२** | |
| १९ | आकुर्डी रुग्णालय ते पंचतारा नगर गणपती मंदिराजवळ |
| २० | आकुर्डी भाजी मंडई ते रुग्णालय |
| २१ | पंचतारा नगर गणपती मंदिर ते रेल्वे लाईन कॉलनी |
| **प्रभाग क्रमांक २३** | |
| २२ | सेन्ट ॲन्ड्र्यूज स्कुल ते हायवे टॉवर्स |
| २३ | मुंबई पुणे रोड ते चिंचवड स्टेशन दर्गा |
| २४ | एम आय डी सी भंगार दुकान कोपरा जे आर डी रोड |
| २५ | प्रिसीजन कंपनी ते पुनम प्रिसीजन |
| २६ | मेहता हॉस्पिटल ते क्वालिटी ब्राईट स्टिल पर्यंत |
| २७ | फेविकॉल शिवलॉन इंडस्ट्रीज ते गर्गमेटल पर्यंत |
| २८ | गर्ग मेटल ते पटेल मार्बल कंपनी पर्यंत |
| २९ | पटेल मार्बल कंपनी ते नीलपेन्टस |
| ३० | विद्यानगर चौक ते नितीन इंडस्ट्रिज ते प्लास्मा इंड |
| ३१ | एस ए आर इंड ते एस के इंड |
| ३२ | दत्तनगर टेलिफोन बुथ ते दातीर पाटील नाल्यापर्यंत |

*ब प्रभाग नाल्यांची यादी*

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | पिंपरी नगर भाटनगर कमान ते रमाबाई नगर कोपरा |
| २ | पिंपरी नगर बी ब्लॉक १४ ते पवना नदीपर्यंत |
| ३ | पिंपरी नगर बी ब्लॉक १ ते २० पर्यंत |
| ४ | खराळवाडी सहारा बिल्डिंग ते एच ए कंपनी भिंत ते खाणीपर्यंत |
| ५ | खराळवाडी श्री घुडसे यांचे घरापासुन श्री रसाळ यांचे घरापय्रंत |
| ६ | खराळवाडी खाणीपासुन ते के एस बी कंपनी कंम्पाऊंड पर्यंत |
| ७ | खराळवाडी साईपॅलेस ते ग्रीन पार्क सोसा ते डी पी पर्यंत |
| ८ | अजमेरा कॉलनी कम्पाउड वॉल ते लुकर झोपडपट्टीपर्यंत |
| ९ | मोरवाडी सी डी वर्क ते रेल्वे मोरी पर्यंत |
| १० | के एस बी कंपनी कम्पाउड ते रेल्वे मोरी पर्यंत |
| ११ | टेल्को कंम्पाउड भिंत ते लिटाका कंपनी ते मुं.पु. रोडपर्यंत |
| १२ | लुकर झोपडपट्टी ते दुर्गाभुवण ते मुंबई पुणे रोड पर्यंत |
| १३ | पिंपरी नगर रेल्वे मोरी ते डिलक्स टॉकीज ते पवना नदी पर्यंत |
| १४ | चिंचवड जैन शाळा सीमा भिंत ते पवना नदीपर्यंतचा नाला |
| १५ | वसंत नर्सरी पासुन ओढ्यापर्यंतचा नाला |
| १६ | पांढारकर नगर रेल्वे पुल ते पिं चिं प्रेक्षागृहापर्यंतचा (प्रेमलोक पार्क जवळील) नाला |
| १७ | पिं चिं प्रेक्षागृह ते पवना नदीपर्यंत |
| १८ | चिंचवड गांव क्रांतीवीर चाफेकर शाळा ते पवना नदीपर्यंत |
| १९ | चिंचवडे रेशनिंग दुकान ते निंबाळकर निवास ते मोरया हॉस्पिटल मागून पवनानदीपर्यंत |
| २० | केशवनगर शाळेमागील मनपा संडास ते वस्ते यांचे घरापर्यंतचा बांधलेला नाला |
| २१ | चिंचवडगाव वस्ते यांचे घर ते भारत भोईयांचे आळीपर्यंतच्या कच्या रस्त्याचे कडेचा नाला |
| २२ | लोकमान्य हॉस्पिटल ते गोलांडे गार्डन ते पवना नदीपर्यंतचा नाला |
| २३ | आनंदनगर वडारवस्ती ते गरवारे कंपनी जवळील रेल्वे मोरी पर्यंतचा नाला |
| २४ | मोरवाडी लिंगायत स्मशानभुमी ते लिटाका कंपनी मागील नाला |
| २५ | लुकास कंपनी समोरिल मुतारी पर्यंतचा नाला |
| २६ | पांढारकर रेल्वे गेटपासुन रेल्वे ब्रीज पर्यंतचा नाला |

## क प्रभाग नाल्यांची यादी

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | नेहरुनगर गुलाब पुष्प उद्यान ते विठ्ठलनगर कॉर्नर ते हॉकी स्टेडियम नाला |
| २ | नेहरुनगर संतोषी माता स्क्रॅप सेंटर ते पठाणचाळ ते नूर मोहल्ला नाला |
| ३ | नेहरुनगर ज्योती इंग्लिश स्कुल ते नेहरुनगर टेकडी नाला |
| ४ | फुगेवाडी अशोक हॉटेलपासुन रेल्वे मोरीपर्यंतचा नाला |
| ५ | कासारवाडी मार्शल कंपनी ते रेल्वेगेट ते पोलिस चौकीपर्यंतचा नाला |
| ६ | नाशिकफाटा शीतल हॉटेल मागील शंकरवाडी पर्यंतचा नाला |
| ७ | भोसरी गवळीनगर संडास ब्लॉक ते दिघी रोड नाला |
| ८ | भोसरी दिघी रोड पुल ते सी एम ई कंपौड पर्यंतचा नाला |
| ९ | नाशिक फाटा खलसे झोपडपट्टी ते नाशिक फाटा गांधी बिल्डींग पर्यंत |
| १० | हिटट्रीक कंपनी ते विठ्ठलनगर नाल्यापर्यंतचा नाला |
| ११ | टेल्कोरोड संडास ब्लॉक ते मनपा कार्यशाळेपर्यंत |
| १२ | क प्रभाग कार्यालयमागील नाला टेल्को रोड ते पॉलीग्रास मैदानापर्यंत |
| १३ | थरमॅक्स केमिकल्स ते पोस्ट ऑफिस ते सी आय आर टी पर्यंतचा नाला |
| १४ | म फुले झोपडपट्टी ते हॉटेल कलासागर |
| १५ | भोसरी एम आय डी सी एस ब्लॉक मनपा गांडुळखत प्रकल्प ते चॅम्पीयन इले पर्यंत |
| १६ | बालाजीनगर झोपडपट्टी ते इले टॉवरजवळील मुख्य नाल्यापर्यंत |
| १७ | आनंद टायर्स एस १६ ते सेचुरीएन्का पर्यंत |
| १८ | श्री स्वामी समर्थ वजनकाटा ते राठोड कॅन्टिन |
| १९ | मे. सिटटर्स फॅब्रि. ऑ इंजि. (जे. ३६८) ते लिमिट गेजेस टुल्स |
| २० | मे. क्रॉसलिंक पॉलीमर्स ते मुख्य रस्ता पर्यंत |
| २१ | जलदुत मेटर्स (जे ८३)ते एस्कॉन पर्यंत |
| २२ | डायना कंपनी ते कॅटमॅट इले जे ४४९ |
| २३ | प्रिया कॅपसिटर्स (जे ३८०) ते जयभवानी कॅन्टीन |
| २४ | देठे फॅब्रिकेटर्स (ए ३६८) ते लिमिट गेजेस कंपनी |
| २५ | गुळवेवस्ती हनुमान मंदिर ते मोठ्या नाल्यापर्यंत |
| २६ | धावडेवस्ती संडास ब्लॉक ते गाव विहिर |
| २७ | सुधारे गार्डन कोपरा ते पुणे नाशिक हायवे मोरीपर्यंत |
| २८ | भोसरी फायर ब्रिगेड मोरी पासुन आदिनाथ नगर पर्यंत |
| २९ | भोसरी गांव विहीर ते फायर ब्रिगेड इमारतीपर्यंत |
| ३० | भोंसरी पीसीएमटी डेपो ते जमीला मंझील जवळील एक्सेव कार्पोरेशन मागील नाला |
| ३१ | लांडेवाडी विश्वलाल हॉटेल ते आण्णा भाऊ साठे चौक |
| ३२ | पुणे नाशिक महामार्ग मोशी ते भोसरी तळ्यापर्यंतचा नाला |

## ड प्रभाग नाल्यांची यादी

| अ.क्र. | नाल्याचे ठिकाण |
|---|---|
| १ | सांगवी शितोळे नगर पुलाजवळ |
| २ | सांगवी हॉटेल नदी किनारा ते काटे ते झोपडपट्टी |
| ३ | नवी सांगवी मोरे यांचे घरापासुन गांगुर्डे यांचे घरापर्यंत |
| ४ | नवी सांगवी ढोरे फार्म ते इंद्रप्रस्थ पर्यंत |
| ५ | सांगवी पी डब्यु डी रोडच्या कडेचे गटर |
| ६ | पिंपळे गुरव नावेच्या रोडच्या कडेचे गटर |
| ७ | पिंपळे गुरव श्री  गांगुर्डे यांचे शेतापासुन काटे बांगर पार्क पर्यंतचा नाला |
| ८ | पिंपळे सौदागर (कुंजीर वस्ती) परफेक्ट फॅब्रिकेशन पासुन तुषार गार्डन पर्यंत |
| ९ | सुदर्शननगर विजय ट्रेडर्स पाटीपासुन नदी पर्यंतचा नाला |
| १० | रहाटणी भागीरथी निवास ते पवना नदी पर्यंत |
| ११ | रहाटणी तलाठी कार्यालय ते मनपा मुतारी पर्यंत |
| १२ | रहाटणी तलाठी कार्यालय ते रहाटणी फाटा श्रीकृष्ण हाऊसिंग सोसा. |
| १३ | रहाटणी सुदाम नखाते यांचे घरामागुन सिंहगड कॉ पर्यंत |
| १४ | रहाटणी रस्ता कल्पना स्टेशनरी ते बिसमिल्ला चिकन सेंटर |
| १५ | सिंहगड कॉलनी बोर्ड ते भरत कोकणे यांचे घरामागील कच्चा नाला |
| १६ | रहाटणी श्रीनगर दर्शनपार्क समोरील देवराम नखाते यांचे शेताजवळील नाला (वृंदावन कॉलनी लगत) |
| १७ | नढेनगर कर्पे यांचे घर ते साईश्रध्दा कॉलनी |
| १८ | नढेनगर बापु नढे यांची विहिर ते मशीदी समोरील नाला |
| १९ | वाकडगांव शेंडेवस्ती ते मुळानदीपर्यंत |
| २० | थेरगाव गावठाण विभागीय कार्यालयामागील नाला |
| २१ | थेरगाव स नं १६ कु-हाडे चाळी जवळील नाला |
| २२ | जगताप डेअरी मुख्य रस्त्याचे दोन्ही बाजुचे गटर |
| २३ | विशालनगर थोपटे हॉटेल मागील नाला मुळा नदीपर्यंत |
| २४ | पिंपरी तपोवन मंदिर ते पवना नदीपर्यंतचा नाला |
| २५ | पिंपरी वाघेरे नंदू कांबळे यांचे घरापासुन पवना नदीपर्यंत (दोन्ही बाजू) |
| २६ | इंगवले वीट भट्टी ते नदीपर्यंत |

महापालिकेचे गटर स्वच्छतेचे काम आठवड्याचे सात ही दिवस चालु असल्याने प्रत्येक कर्मचा-याची साप्ताहिक सुट्टी व रजा विचारात घेता २० टक्के रजा राखीव कर्मचारी आवश्यक असतात. परंतू वर्कलोडच्या मानाने कर्मचारी अपुरे असल्याने काही प्रमाणात खाजगीकरणाव्दारे कामकाज करून घेतले जाते.

### *शौचालयांची प्रभाग निहाय माहिती*

| प्रभाग | सार्वजनिक संडास | | | | म.न.पा शाळा / इमारती मधील | | एकुण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नागरी भागातील | | झोपडपट्टीमधील | | | | | |
| | ब्लॉक | सीट | ब्लॉक | सीट | ब्लॉक | सीट | ब्लॉक | सीट |
| अ | १३८ | ९०९ | ३७ | ३७६ | ८५ | २३३ | २६० | १५१८ |
| ब | ६४ | ४७० | ५५ | ५०२ | १३३ | २४६ | २५२ | १२१८ |
| क | ८४ | १०७० | ४४ | ५११ | ६१ | २८३ | १८९ | १८६४ |
| ड | १२९ | ८२३ | ११ | ६० | ३७ | २८८ | १७७ | ११७१ |
| **एकुण** | **४१५** | **३२७२** | **१४७** | **१४४९** | **३१६** | **१०५०** | **८७८** | **५७७१** |

### *शौचालय सफाईकामी प्रभागनिहाय नेमलेल्या संस्थांची संख्या.*

| अ.क्र. | प्रभाग | | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| | अ | ब | क | ड | |
| १ | ६ | ५ | ४ | ३ | १८ |

### *मुता-यांची प्रभाग निहाय माहिती :-*

| प्रभाग | सार्वजनिक | | मनपा शाळा इमारती | |
|---|---|---|---|---|
| | ब्लॉक | सीट | ब्लॉक | सीट |
| अ | ११० | २२४ | ४७ | ३३८ |
| ब | १३३ | ३०७ | ११ | ६६ |
| क | ११२ | २१८ | ४६ | ३४१ |
| ड | ६२ | ११७ | २७ | २१९ |
| एकुण | ४१७ | ८६६ | १३१ | ९६४ |

यापैकी ६२९ ब्लॉक ४९७३ सीट्स शौचालयांची दैनंदीन स्वच्छता देखभालीचे काम एकुण १८ स्वयंरोजगार संस्था, स्थानिक संघटनावर सोपविले असुन उर्वरीत २४९ ब्लॉक ७९८ सीटस संडास तसेच १८३० सीटस मुता-या सफाईकामी १४७ सफाई सेवक कर्मचारी नेमले आहेत. त्यांना म.न.पा. परिसरात होणारी मैला टेकडी उचलणे, कुत्री, मांजरी, धुशी इत्यादी मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे ही कामे ही दिली आहेत.

याखेरीज पैसे द्या व वापरा तत्वावर खाजगी संस्थांना खालील ठिकाणी शैाचालये बांधुन घेऊन त्यांना कराराने चालविण्यास देण्यात आली आहेत.

## *पैसे द्या व वापरा तत्वावर बांधलेली स्वच्छतागृहे*

| अ.क्र. | ठिकाण | ब्लॉक | सीटस |
|---|---|---|---|
| १ | भोसरी भाजी मंडई | १ | २० |
| २ | वाहतुकनगरी निगडी | १ | ११ |
| ३ | दत्तनगर झोपडपट्टी आकुर्डी | २ | २० |
| ४ | रामनगर झोपडपट्टी आकुर्डी | ३ | ३० |
| ५ | भिमनगर पिंपरी | १ | ०६ |
| ६ | बौध्दनगर पिंपरी | १ | ०८ |
| ७ | थेरगाव | १ | २० |
| ८ | ५७६ गाळे निगडी | १ | १० |
| ९ | बालाजीनगर भोसरी | १ | २० |
| १० | सिध्दार्थनगर दापोडी | १ | २० |

म.न.पा. ची सार्वजनिक ठिकाणच्या इतर शौचालयांचेही हळुहळु 'पैसे द्या व वापरा ' तत्वावर रुपांतर करण्याचा विचार आहे.

## *फिरत्या शौचालयांची प्रभाग निहाय माहिती*

| प्रभाग | अ | ब | क | ड | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| टॉयलेट व्हॅन | १० | १० | १० | १० | ४० |

**मलजेट मशिन:-**

मनपाचे चारही प्रभागा मिळुन ५ मलजेट मशिन असुन त्या मार्शन मार्फत प्रभाग क्षेत्रातील मुता-या ब्लॉक ४१७ सिटस ८६६ दररोज साफ करून घेतले जात आहे तसेच मनपाचे कचरा वाहने धुण्यासाठी त्याचा चांगल्या प्रकारे वापर होतो.

२) ***घरोघरचा कचरा गोळा करणे. :-***

***<u>घंटागाडी ठेकेदार :</u>***

महापालिका परिसरातील विशेषत: निवासी भागातील घरोघरचा कचरा गोळा करण्यासाठी घंटागाडी चालक ठेका पध्दतीने नेमण्यात आले असुन त्यांना साधारण ३०० कुटुंबाचा परीसर नेमून दीला आहे. ते सकाळच्या वेळी १२ वाजेपर्यंत घरोघरी जावून कचरा गोळा करतात. तद्‌नंतर २ वाजेपर्यंत त्यांचेकडून रस्त्यावरचा पालापाचोळा इत्यादी जमा करण्याचे व साफसफाईचे काम करून घेण्यात येते. महापालिकेतर्फे त्यांना कचरा गोळा करण्यासाठी घंटागाड्या व प्लॅस्टीकचे २ ड्रम देण्यात आले आहेत. त्यानुसार ते घरोघरचा कचरा शक्यतो ओला व सुका असा वेगवेगळा गोळा करुन महापालिकेने ठरवुन दिलेल्या कचरा कुंडीत आणुन टाकतात. सध्या प्रभाग निहाय नेमलेले घंटागाडी चालक व त्यांचे कडून कीती कुटुंबाचा कचरा जमा होतो याची माहिती पुढीलप्रमाणे.

| **प्रभाग** | **घंटागाडी ठेकेदारांची संख्या** | **समाविष्ठ कुटुंबाची संख्या (सुमारे)** | **गोळा होणारा कचरा प्रतिदिन (सुमारे)** |
|---|---|---|---|
| अ | ८१ | २४३०० | ५० मे. टन |
| ब | ८६ | २५८०० | ५१ मे. टन |
| क | ८७ | २६१०० | ५२ मे. टन |
| ड | ९१ | २७३०० | ५४ मे. टन |
| **एकुण** | **३४५** | **१०३५००** | **२०७ मे. टन** |

याप्रमाणे घंटागाडी ठेकेदारामार्फत ४६.४० टक्के घरातील कचरा गोळा केला जातो.

***कुंडीविरहीत वॉर्डस :-***

घंटागाडी ठेकेदारांमार्फत घरोघरचा कचरा गोळा करणेसाठी महापालिकेने कचरा कुंडी विरहीत वॉर्ड योजना सुरुवातीस प्रायोगिक तत्वावर सुरु केली होती. तिला उत्तम प्रतिसाद मिळाल्याने आणखी काही वॉर्डात तिचे विस्तारीकरण करण्यात आले आहे. त्यानुसार खालील वॉर्डात सदर योजना सुरु आहे.

| प्रभाग | वॉर्ड क्र. (जुना वॉर्ड क्र.) | मनपाने नेमलेली वाहने | खाजगी वाहने | व्यक्ती कुटुंब संख्या | रोज गोळा केला जाणारा कचरा (टनामध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| अ | १८,१९-प्राधिकरण<br>२३-संभाजीनगर | १ | ७ | १६९८० | ३० मे. टन |
| ब | २७-वाल्हेकरवाडी<br>३२- प्रेक्षागृह | ४ | ० | ८६१० | १७ मे. टन |
| क | ७- इंद्रायणीनगर | १ | ० | १३५८ | २.७ मे. टन |
| ड | - | - | - | - | - |
| **एकुण** | ७ | ६ | ७ | २६९४८ | **४९.७ मे. टन** |

*ॲटो रिक्षा हॉपर्स*

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने घरोघरी कचरा गोळा करणेसाठी वरील बाबी व्यतिरिक्त काम जलद गतीने होणेसाठी व जास्ती जास्त कचरा गोळा करण्यासाठी जे.एन.एन. यु.आर.एम.अंतर्गत केंद्र शासनाचे अनुदानातुन ६० ॲटो रिक्षा हॉपर्स खरेदी करण्यात आले असुन त्यापासून घरोघरचा कचरा गोळा करीत आहे. त्याचे संबंधीत माहिती खाली नमुद केली आहे.

| प्रभागाचे नाव | ॲटोरिक्षा हॉपर संख्या | वॉर्ड क्र | व्यक्ती कुटुंब संख्या | रोजगोळा केला जाणारा कचरा |
|---|---|---|---|---|
| अ प्रभाग | १५ | ३७,५१,५२,५३,५४,४८ | १८००० | ७,२०० |
| ब प्रभाग | १५ | ५९,६०,६२,६१,६४,६५,६६,६७,६८,७१ | १०४५० | ७३८० |
| क प्रभाग | १३ | २६,२७,३०,१००,१०२,१०३,१०४ | १४३०० | ५७२० |
| ड प्रभाग | १७ | ७३,९१,९२,९३,८९,९०,८६ | २१२५० | ८५०० |
| **एकुण** | ६० | **३० वॉर्ड** | ६४००० | २८८०० |

उपरोक्त वॉर्डात मनपा कचरा वाहतुक वाहन नियोजित वेळापत्रकानुसार व मार्गानुसार फिरविले जाते व नागरिकांच्या घरोघरचा कचरा गोळा केला जातो. सदर योजनेमुळे वॉर्डात कचरा कुंडया ठेवल्या नाहीत त्यामुळे पुढील फायदे झाले आहेत.

१. कचरा कुंडी भोवती जनावरे जमून रहदारीला होणारा त्रास दूर झाला.

२. कचराकुंडीची दुर्गंधी नष्ट झाली.

३. कचरा अलगीकरणाचे प्रमाण वाढले.

३) *कचरा अलगीकरण:-*

घरोघरचा कचरा गोळा करण्यासाठी कागदपत्रांसंघटने बरोबर करार करणार असुन अ प्रभागातील ९ वॉर्ड ब प्रभागातील ९ वॉर्ड क प्रभागातील १३ वॉर्ड ड प्रभागातील ०९ वॉर्ड असे एकुण ४० वार्डमधील घरोघरचा कचरा सुका व ओला असे वेगवेगळे गोळा करणार आहेत सुका कचरा ते स्वत: घेऊन जाणार आहेत व ओला कचरा मोशी कचरा डेपो येथील गांडुळ खत प्रकल्पासाठी त्याचा वापर होणार आहे. कच-यात काच, पत्रा, कागद, लोखंड, प्लॅस्टीक, टायर, ट्युब, ॲल्युमिनिअम, तार असे प्रकारे अनेक वस्तु आहेत त्याचा पुर्नवापर करता येतो.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कागद काच पत्रा कष्टकरी पंचायत संघटना यांच्या समवेत दि २९/०२/०८ रोजी मा. आयुक्त यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार प्रभाग क्षेत्रातील खालील प्रमाणे एकुण ४० वॉर्डामध्ये कचरा अलगीकरण करून गोळा करण्याचे काम नियोजित करण्यात आलेले आहे.

| **प्रभाग** | **समाविष्ठ वॉर्डची संख्या** | **कचरा अलगीकरण करण्यासाठीच्या जागांची संख्या** | **वॉर्ड नं.** |
|---|---|---|---|
| अ | ९ | २ | २,३,४,५,३८,३९,४०,४१,४३ |
| ब | ९ | ५ | ३१,३२,३३,३४,६६,६७,६९,७०,७१ |
| क | १३ | ७ | १३,१४,१५,१६,१७,१८,१९,९९,१००,१०२,१०३,१०४,१०५ |
| ड | ९ | ६ | ७८,७९,८०,८१,८२,८३,८४,८५,८८ |
| **एकुण** | **४०** | **२०** | **४०** |

या वॉर्डाची एकुण कुटुंबाची संख्या १,१७,११० असुन याकामी ४५० ते ५०० कुटुंबामागे २ रॅकपिकर्सची संख्या निश्चित करून आवश्यक रॅकपिकर्स ५१२ या कामासाठी उपलब्ध करून देणार आहे व त्यांनी जमा / गोळा केलेल्या कचऱ्याचे विलगीकरण / विघटन करण्यासाठी त्यांना मनपा कार्यक्षेत्रातील जागा / ठिकाणी एकुण २० निश्चित करण्यात आली आहे. रॅगपिकर्स यांना कचरा गोळा /वेगळा करताना स्वत:च्या संरक्षणासाठी मास्क, टोपी, ॲप्रन, साडी, ड्रेस, बुट, हातमोजे , बादली , हातकार्ड, ट्राली , तीन चाकी सायकल देण्यात येणार आहे.

अ. प्रभाग कार्यालय :- चिखली मैला शुध्दीकरण केंद्र आवार, विद्यानगर खान परिसर

ब. प्रभाग कार्यालय :- वाय.सी.एम. हॉस्पिटलमागे, कामगार भवन मुतारीमागे, तालेरा हॉस्पिटलमागे, श्रीमान बिल्डींग शेजारील मोकळी जागा, स्मशानभुमी मोकळी जागा

क. प्रभाग कार्यालय :- स्मशानभुमी भोसरी तळ्याजवळ, खंडोबामाळ पंपींग स्टेशन, एस टी पी प्लॅन्ट, कासारवाडी स्मशानभुमी, दापोडी स्मशानभुमी आनंदवन आश्रम टाकीजव, बोपखेल स्मशानभुमी

ड. प्रभाग कार्यालय :- पवनानगर आरक्षित जागा, केजु देवी उद्यान, महिला बाल केंद्र, मारुती डांगे सांस्कृतीक केंद्र, वेणुनगर प्रथम सोसायटी शेजारील मनपा मोकळा पलॉट, याप्रमाणे संबंधित प्रभाग अधिकारी यांनी जागा सुचविल्या आहे.

शहर स्वच्छ ठेवणेसाठी फक्त स्थानिक स्वराज्य संस्थाचे परिश्रम उपयोग पडणार नसून त्यामध्ये जे कचरा निर्माण करतात अशा नागरिकांचे सहकार्य व सहभाग आवश्यक आहे. अन्यथा कितीही वेळा साफसफाई केली तरी ते स्वच्छ राहु शकत नाही. यासाठी नागरीकांनी त्यांच्या घरगुती/ व्यवसायातुन निर्माण होणारा कचरा उघड्या रस्त्यावर किंवा नाल्यात न टाकता ज्या ठिकाणी कचरा निर्माण होतो त्या ठिकाणी कचरापेटीमध्ये किंवा प्लॅस्टिक पिशवीमध्ये किंवा कागदाचे पिशवीमध्ये साठवावा व ठरवून दिलेल्या ठिकाणी ठेवल्यास किंवा टाकणेबाबत सुचना दिल्यास शहरामध्ये होणारे अस्वच्छतेचे प्रमाण नक्कीच कमी होईल. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने याकरीता एक नाविन्यपुर्ण प्रकल्प सुरु केला आहे. त्याला कुंडीविरहित वॉर्ड असे संबोधले जाते. कुंडी विरहीत वॉर्डातील नागरीक घरगुती व व्यवसायातील निर्माण होणारा कचरा त्यांचे घरातच / व्यवसायाचे ठिकाणी एका कचरापेटीमध्ये जमा करून ठेवतात. साठवलेला कचरा दररोज एक टेम्पो वॉर्डामध्ये फिरवुन सर्व कचरा गोळा केला जातो व त्याची स्वतंत्रपणे विल्हेवाट लावण्यात येते. या प्रकारची कुंडीविरहीत योजना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ८

वॉर्डामध्ये सध्या सुरु आहे. त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या काही नगरसेवकांनी त्यांचे वॉर्ड कुंडीविरहीत वॉर्ड करणेत यावेत, अशी मागणी केली असून पिंपरी चिंचवड महानगरपालिका कुंडिविरहीत वॉर्डस करण्याचा प्रयत्न करणार आहे.

**४) कच-याची साठवणुक करणे.**

शहरातील ज्या ठिकाणी उघड्यावर रोज कचरा टाकलेला दिसून येतो अशा ठिकाणी कचरा कुंडीची व्यवस्था केली आहे. झोपडपट्टी, सोसायटी, भाजी मंडई, मच्छी बाजार, कत्तलखाना, दवाखाने / रुग्णालये येथे कचरा कुंड्या ठेवण्यात आल्या आहेत.

कचरा साठवणूकीकरीता महापालिकेने १ घनमीटर आकाराचे कंटेनर व काही ठिकाणी बांधीव कचराकुंड्या तर काही ठिकाणी आर.सी.सी. गोल कुंड्या ठेवलेल्या आहेत. या कचरा कुंड्यामध्ये सर्वसाधारणपणे घरातुन व व्यवसायातुन निर्माण होणारा कचरा टाकला जातो. नागरी घनकचरा नियमानुसार ओल्या कच-यासाठी निळ्या रंगाच्या कचरा कुंड्या ठेवल्या आहेत. प्रभागावर कचरा साठवणूकीकरीता पुढीलप्रमाणे व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी जे.एन.एन.यु.आर.एम. चे अंतर्गत केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त झाल्याने त्यातुन १.१ घ.मी. कचरा कंटेनर्स ५०० नग खरेदी करण्यात आले आहेत. सदर कंटेनर्सना झाकणाची सोय आहे.तसेच ते कॉम्पॅक्टर मार्फत यांत्रिकी पध्दतीने उचलले जातात. चारही प्रभागात सध्या ठेवलेल्या कचरा कुड्यांची संख्या खालीलप्रमाणे

*कचरा कुंडीचा प्रकार व प्रभागवारी संख्या*

| प्रभाग | आर.सी.सी. | १ घ.मी. | ७ घ.मी. | बांधीव | १.१ घ.मी. | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| अ | ११० | २३० | २३ | १ | १४४ | ५०८ |
| ब | ६३ | ११९ | २० | ४ | १०० | ३०६ |
| क | ७६ | १४५ | १२ | २६ | ११२ | ३७१ |
| ड | ४० | ८० | १३ | ९ | १४४ | २८६ |
| **एकुण** | २८९ | ५७४ | ६८ | ४० | ५०० | १४७१ |

## ५) कचरा वाहतुक करणे.

कचरा वाहतुक ही एक घनकचरा व्यवस्थापनाची एक महत्वाची बाब आहे. यासाठी ज्या ठिकाणी जास्त प्रमाणात कचरा निर्माण होतो. त्याठिकाणी दिवसातुन दोन वेळा व ज्या ठिकाणी कमी प्रमाणात कचरा निर्माण होतो त्या ठिकाणी दिवसातुन एक वेळा कचरा उचलला जातो व कचरा झाकून वाहतुक करण्यात येते. महानगरपालिकेच्या प्रत्येक प्रभागात कचरा वाहतुक करणेसाठी मार्ग आखुन दिले असुन त्या मार्गातुनच कचरा गोळा करून, वाहनात भरुन वाहतुक केली जाते. महानगरपालिकेकडे सद्यस्थितीमध्ये एका शिफ्टमध्ये काम करणेत येते. वेळप्रसंगी दोन शिफ्टमध्ये काम करणेत येईल.

कचरा वाहतुक करणेसाठी वापरणेत येणा-या वाहनाचा वापर पुर्णक्षमतेने करणेसाठी व वाहनाच्या देखरेखीसाठी एक स्वतंत्र कार्यशाळा असून तेथे नादुरुस्त झालेल्या वाहनाची त्वरीत दुरुस्ती करून वाहन वापरणेसाठी उपलब्ध करून देणेत येते. सद्यस्थितीत मनपा हद्दीत निर्माण झालेला कचरा मनपाचे वाहनातुन आणि खाजगी ठेकेदाराच्या वाहनातुन मोशी कचरा डेपो येथे विल्हेवाट करण्यासाठी पाठविला जातो. सर्व वाहने मोशी कचरा डेपोपर्यंत वाहतुक होण्यासाठी काही वेळ लागतो आणि इंधन जास्त लागते, ही बाब लक्षात घेवुन एम.आय.डी.सी. मध्ये मध्यवर्ती ठिकाणी स्थानांतरण केंद्र आहे शहरातील सर्व कचरा सुरुवातीस या ठिकाणी जमा करून बी आर सी या गाडीमधुन कचरा डेपो येथे विल्हेवाट करण्याकामी व्यवस्था करण्यात येते अशा प्रकारची चार बी.आर.सी वाहने म.न.पा. ने खरेदी केलेली आहेत. सद्या कचरा वाहतुकीसाठी उपलब्ध असलेली म.न.पा च्या मालकीची व खाजगी ठेकेदाराकडील वाहने खालीलप्रमाणे आहेत.

### *कचरा वाहतुकीकडील प्रभागवार वाहन प्रकार व वाहन संख्या*

| वाहन प्रकार | अ प्रभाग | ब प्रभाग | क प्रभाग | ड प्रभाग | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| कॉम्पॅक्टर मोठे | ३ | २ | २ | ३ | १० |
| कॉम्पॅक्टर मध्यम | १ | १ | १ | १ | ४ |
| डंपर प्लेसर | ५ | ५ | ४ | ४ | १८ |
| डयुएल डंपर प्लेसर | २ | ० | ० | ० | २ |
| मोठे ट्रक (मनपा) | २ | ० | ० | ० | २ |
| मध्यम ट्रक | ० | ४ | ० | २ | ६ |
| छोटे ट्रक | ० | ० | २ | ० | २ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बी आर सी वाहने | ० | ० | ५ | ० | ५ |
| ॲटो रिक्षा हॉपर्स | १५ | १५ | १३ | १७ | ६० |
| एकुण | २८ | २७ | २७ | २७ | १०९ |
| मैला वाहतुक वाहन | | | | | |
| मैला टैकर | ४ | २ | ४ | ४ | १४ |
| ठेकेदार वाहने | | | | | |
| कचरा ट्रक | १२ | ८ | ९ | ९ | ३८ |
| हॉटेल वेस्ट वाहने | २ | २ | २ | १ | ७ |
| इतर वाहन | | | | | |
| टॉयलेट व्हॅन | १० | १० | १० | १० | ४० |
| मल जेट मशिन्स | १ | १ | २ | १ | ५ |
| नाला क्लिनिंग मशीन (टॅक्टरसह) | १ | १ | १ | १ | ४ |
| टॅक्टर्स | १ | १ | १ | १ | ४ |
| रोड स्विपर टॅक माउटेड | - | - | - | - | १ |

जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेअंतर्गत १० मोठे कॉम्पॅक्टर व ४ छोटे कॉम्पॅक्टर खरेदी करण्यात आले आहेत, हे कॉम्पॅक्टर बंद पध्दतीचे प्रती खेपेला १०-१२ मे. टन कचरा गोळा करु शकतात. मोठे कॉम्पॅक्टर एक वेळेस १.१ घन मी. च्या जवळ जवळ २५ ते ३० कचरा कुंड्यांमधुन कचरा गोळा करु शकतात व छोटे कॉम्पॅक्टर एका वेळेस १२ ते १५ कचरा कुंड्यांमधुन कचरा गोळा करतात. ह्या वाहनांच्या खरेदीमुळे खाजगी ठेकेदारांची वाहने कमी करण्यात आली त्यामुळे म.न.पा.च्या खाजगी ठेकेदारांच्या वाहतुकीवर होणारा खर्च कमी झाला आहे. माणसे लावुन कचरा गोळा करण्याचा खर्च ही कमी झाला आहे. कॉम्पॅक्टर च्या वाहतुकीचा मार्ग ही ठरवुन देण्यात आलेला आहे ज्यामुळे ह्या वाहनांची अनावश्यक वाहतुक ही कमी झाली आहे.

## सन - २००५ - २००६

| प्रभाग | मनपा वाहनामार्फत मे. टन | ठेकेदार वाहनांमार्फत मे. टन | हॉटेल वेस्ट मे. टन | एकुण मे. टन |
|---|---|---|---|---|
| अ | ६९०७ | ४१०१९ | १२७३ | ४९१९९ |
| ब | ५५४७ | २९०७५ | ८९३ | ३५५१५ |
| क | ६१६३ | ३८२२८ | ३७४ | ४४७६५ |
| ड | ३६४७ | ५३४५३ | २४२ | ५७३४२ |
| एकुण | २२२६४ | १६१७७५ | २७८२ | १८६८२१ |

## सन २००६-२००७

| प्रभाग | मनपा (मे. टन) | ठेकेदार(मे. टन) | हॉटेल वेस्ट (मे. टन) | एकुण (मे. टन) |
|---|---|---|---|---|
| अ | ८२६६.१९० | ४५८००.८३० | १५२८.७०० | ५५५९५.७२० |
| ब | ५६९८.२५० | ३७२९६.२२५ | १०३०.४६५ | ४४०२४.९४० |
| क | ९०७१.१४० | ४००१२.४२० | ६२४.७५० | ४९७०८.३१० |
| ड | ३४१८.४५० | ६६०९८.८२० | ५२३.२७० | ७००४०.५४० |
| एकुण | २६४५४.०३० | १८९२०८.२९५ | ३७०७.१८५ | २१९३६९.५१० |

## सन २००७-२००८

| प्रभाग | मनपा वाहनामार्फत मे. टन | ठेकेदार वाहनांमार्फत मे. टन | हॉटेल वेस्ट मे. टन | एकुण मे. टन |
|---|---|---|---|---|
| अ | ८७४४.७४० | ४६७९४.८७० | १८३१.३१५ | ५७३७०.९२५ |
| ब | ६६९०.७५० | ५०८९७.६५० | १२२३.७४५ | ५८८१२.१४५ |
| क | ८८२४.८५० | ४१९५३.६३० | ५८४.०३० | ५१३६२.५१० |
| ड | ५१३५.८३३ | ६४२५७.३८५ | ९१८.५३० | ७०३११.७४८ |
| एकुण | २९३९६.१७३ | २०३९०३.५३५ | ४५५७.६६ | २३७८५७.३७४ |

## ६) *कच-यावर प्रक्रिया करणे व योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे :-*

सन १९९२ मध्ये मोशी येथील ८० एकर जागेत स्थलांतरीत करण्यात आलेला आहे व भोसरीच्या कचरा डेपोत वृक्षारोपण करण्यात आले. मोशी येथील कचरा डेपोमध्ये प्रतिदिनी १०० ते १२५ ट्रक कच-याची अशास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येत होती. या कचरा डेपो करीता ८० एकर जागा असली तरी त्यापैकी ३५ टक्के जागेतच कचरा टाकण्यात आलेला आहे. हा टाकण्यात आलेला कचरा नियोजनबध्दतेने न टाकला गेल्यामुळे काही ठिकाणी कच-याचे ढीग पडत होते. सद्यस्थितीत कचरा डेपोमध्ये आलेला कचरा पसरवून बुलडोझरने रोड रोलरने दाबून त्यावर मुरुम टाकला जातो. याकामी मनपा मार्फत एक नविन जेसीबी मशिन खरेदी करण्यात आले असून बुलडोझर व रोडरोलर खाजगी ठेकेदारांकडून भाडेतत्वावर करार करून उपलब्ध करुन घेण्यात आले. त्याच बरोबर दुस-या ठिकाणी कचरा डेपो सुरु करण्यासाठी जागेची पाहणी करण्यात येत आहे. पुनवळे गावातील वनखात्याची ५७ एकर जागा निश्चित करण्यात आली असून ती शासनाकडून लवकरच म न पा च्या ताब्यात मिळेल. सद्यस्थितीत मोशी येथे सदर कचरा डेपोसाठी सिमाभिंत बांधण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणा-या कच-याची विल्हेवाट ही कच-याच्या प्रकारानुसार पुढीलप्रमाणे केली जाते.

### *हॉटेलमधील टाकाऊ अन्न (हॉटेल वेस्ट)*

नागरी घनकचरा नियमानुसार विघटनशील कचरा स्वतंत्रपणे गोळा करणे आवश्यक आहे. त्याचा एक भाग म्हणून हॉटेल / कॅन्टीन्स मधून रोज निर्माण होणारे टाकाऊ अन्न (हॉटेल वेस्ट) स्वतंत्रपणे गोळा करण्याची व्यवस्था महापालिकेतर्फे करण्यात आली त्यानुसार प्रभागनिहाय हॉटेलची व वर्षभरात गोळा केलेले हॉटेल वेस्ट यांची माहिती दिली आहे.

| प्रभाग | सन २००५-०६ | | सन २००६-०७ | | सन २००७-०८ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हॉटेलची संख्या | गोळा केलेला कचरा मे. टन | हॉटेलची संख्या | गोळा केलेला कचरा मे. टन | हॉटेलची संख्या | गोळा केलेला कचरा मे. टन |
| अ | १२५ | १२७३ | २०५ | १५२८.७० | २०५ | १८३१.३१५ |
| ब | ८२ | ८९३ | १२७ | १०३०.४६५ | १२७ | १२२३.७४५ |
| क | ५५ | ३७४ | ११९ | ६२४.७५ | ११९ | ५८४.०३० |
| ड | ४५ | २४५ | ६६ | ५२३.२७ | ६६ | ९१८.५३० |
| एकुण | ३०७ | २७८५ | ५१७ | ३७०७.१८५ | ५१७ | ४५५७.६२० |

सदरच्या हॉटेल वेस्टवर प्रक्रिया करण्यासाठी मोशी येथे 'व्हर्मी कंपोस्टींग प्लॅन्ट 'उभारला असुन तो मे. एनर्जी टेक सोल्युशन प्रा.लि. भाडेतत्वावर या संस्थेस चालविण्यास दिला आहे.

### *सर्वसाधारण कचरा :-*

| प्रभाग | मनपा (मे टन) | ठेकेदार(मे टन) | एकुण (मे टन) | विल्हेवाटीची पध्दत |
|---|---|---|---|---|
| अ | ८७४४.७४० | ४६७९४.८७० | ५५५३९.६१ | मोशी कचरा डेपो येथे शास्त्रीय पदतीने लावण्यात येते. सविस्तर माहिती पुढे दिली आहे. |
| ब | ६६९०.७५० | ५०८९७.६५० | ५७५८८.४ | |
| क | ८८२४.८५० | ४१९५३.६३० | ५०७७८.४८ | |
| ड | ५१३५.८३३ | ६४२५७.३८५ | ६९३९३.२१८ | |
| **एकुण** | **२९३९६.१७३** | **२०३९०३.५३५** | **२३३२९९.७०८** | |

### *रुग्णालयीन कचरा*

| | | | |
|---|---|---|---|
| रुग्णालयीन कचरा ४२०० खाटा | ६८३९८ किलो प्रती वर्ष | पॉस्को या कंपनी मार्फत काम केले जाते. | वायसीएमएच येथील इनसिनेरेटर व्दारे बी एम डब्ल्यु रुल प्रमाणे विल्हेवाट केली जाते. |

### *भाजी मंडई कचरा व्यवस्थापन :-*

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत १२ भाजी मंडई आहेत. या भाजीमंडईमधुन प्रतिदिनी अंदाजे २० ते २५ टन पालापाचोळा निर्माण होतो. हा पालापाचोळा सर्वसाधरण कच-यात न मिसळता त्याची स्वतंत्रपणे वाहतुक करुन जैव वैज्ञानिक पध्दतीने गांडुळखत निर्मीती प्रकल्पासाठी दिला जातो.

### *औद्योगिक कचरा :-*

उद्योगधंद्यामध्ये दोन ठिकाणाहुन कचरा निर्माण होत असतो.

अ) इंडस्ट्रीयल वेस्ट

ब) डोमेस्टीक वेस्ट

***अ) इंडस्ट्रीयल वेस्ट :-*** वस्तुनिर्मितीच्या ओघातुन निर्माण होणारा कचरा, ज्याचा पुनर्वापर होणार अशा स्वरुपाचा कचरा भंगारवाले दुकानदारांना विकतात. वस्तुनिर्मीतीच्या ओघातुन निर्माण झालेल्या घातक कच-याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ही संबंधित कंपन्याची आहे. अशा कच-याची

विल्हेवाट लावण्याकरीता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने कंपन्यांना काही नियम ठरवून दिलेले आहेत. या सुचनांनुसार कंपन्या घातक कच-याची विल्हेवाट लावतात. तरीसुध्दा काही उद्योगधंदेवाले चोरून त्यांचेकडील कचरा उघड्या जागेवर टाकतात अशा उद्योजकांविरुध्द कारवाई करण्यात येते. वास्तविक: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एम.आय.डी.सी.) कंपन्यामधुन निघणा-या कच-याची विल्हेवाट लावण्याकरीता स्वतंत्र जागेची योजना करणे आवश्यक होते. परंतू तसे झालेले नाही. आता महापालिकेच्या पुढाकाराने कंपन्यामधुन निघणा-या अविषारी कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी जागा निश्चित करण्याचे विचाराधिन आहे. नियमानुसार या प्रकारचे जागा निश्चितीसाठी शासनाची परवानगी आवश्यक असते.

***ब) डोमेस्टीक वेस्ट :-*** पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये ५५ कंपन्यांत कॅन्टीन आहेत. कॅन्टिनमध्ये निर्माण होणा-या कच-यापासुन गांडूळखत प्रकल्प कंपन्यांनी त्यांच्या जागेत राबवावा या करीता अशा उद्योजकांच्या वेळोवेळी बैठका घेण्यात आलेल्या आहेत. त्याला प्रतिसाद म्हणुन फोर्बस मार्शल, गरवारे वॉलरोप्स या कंपन्यांनी त्यांच्या जागेत गांडूळ शेती प्रकल्प राबविले आहेत. तर बजाज ऑटो व बजाज टेंपो या कंपन्या कॅन्टीन पासुन निर्माण होणा-या कच-यापासुन बायोगॅस निर्मितीचा प्रकल्प राबविणार आहेत व अन्य कंपन्यांतील कॅन्टीन मधुन निघणारा कचरा उदा. खरकटे अन्न, टरफले इत्यादी डुकरांना अन्न म्हणुन देतात.

## *रुग्णालयामधुन निर्माण होणारा कचरा :-*

रुग्णालयामधून निर्माण होणारा कचरा हा विशिष्ठ प्रकारचा सुक्ष्म जंतुयुक्त कचरा असतो. जर या कच-याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन न केल्यास या कच-यामध्ये असलेल्या जंतुचा शहरात अनेक मार्गाने प्रसार होऊन नागरी आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता असते. त्यामुळे शहरात आजाराचे प्रमाण वाढु शकते. म्हणून रुग्णालयातील कच-याची स्वतंत्रपणे विल्हेवाट लावणे हे महत्वाचे आहे.

रुग्णालयामधुन निघणा-या घातक कच-याचे दुष्परीणाम विचारात घेऊन केंद्र शासनाच्या 'पर्यावरण व वनविभागाने पर्यावरण कायदा १९८६' च्या आधारे, 'जैविक वैद्यकिय कच-याचे व्यवस्थापन (बायो मेडिकल (मॅनेजमेंट ॲन्ड हॅन्डलिंग वेस्ट) नियम १९९८' तयार केला असून दिनांक २०-७-१९९८ च्या भारत सरकारच्या राजपत्रामध्ये प्रसिध्द केला आहे. या नियमातील नियम ६३ (ई) मध्ये हे नियम जैविक वैद्यकिय स्वरुपाचा कचरा निर्माण करणारे, त्याची साठवणुक करणारे, वाहतूक करणारे,

हाताळणारे व विल्हेवाट लावणारे व त्यांच्यावर प्रक्रिया करणा-या संस्थांकरीता आहे. केंद्र शासनाने हे नियम जुलै १९९८ मध्ये केलेले आहेत. हे नियम अंमलात येण्यापूर्वीच महापालिकेने वैद्यकिय जैविक कच-याची विल्हेवाट लावण्याकरीता यशवंतराव चव्हाण रुग्णालयास इनसिनेटर बसवून माहे जानेवारी १९९८ कार्यान्वित केला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत ४३२ वेगवेगळ्या प्रकारचे म्हणजेच आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, ॲलोपॅथी इ. शाखेचे दवाखाने आहेत. बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट प्रमाणे १५७ खाजगी रुग्णालयांची नोंदणी महानगरपालिकेकडे झालेली आहे. या सर्व रुग्णालयातील खाटांची एकुण संख्या ४२०० इतकी आहे. ज्यावेळी रुग्ण रुग्णालयात असतात त्यावेळी प्रतिदिनी प्रति कॉटमागे ७५ ग्रॅम विघातक कचरा निर्माण होतो.सर्व रुग्णालय प्रमुखांनी त्याच्या रुग्णालयात निघणा-या घातक कच-याची विल्हेवाट महानगरपालिकेने यशवंतराव चव्हाण रुग्णालयात बसविण्यात आलेल्या इनसिनेटर मध्ये नष्ट करण्यास संमती दर्शविली. त्यानुसार खाजगी रुग्णालयातील घातक कचरा केंद्र शासनाच्या पर्यावरण व वनविभागाने पर्यावरण कायदा १९८६ च्या आधारे, जैविक वैद्यकिय कच-याचे व्यवस्थापन (बायो मेडिकल (मॅनेजमेंट ॲन्ड हॅन्डलिंग वेस्ट) नियम १९९८ नष्ट करण्या-यासंदर्भात रुग्णालय प्रमुखांना सुचना देण्यात आल्या आहेत.

मनपाच्या प्रशासनाने रुग्णालयीन प्रमुखाकडून येणा-या जैव वैद्यकिय कच-याच्या विल्हेवाटीसाठी र. रु. ५००/- प्रती दवाखाना प्रति रुग्णालयांकडून र रु १०००/- प्रति वर्षी खाटांच्या संख्येचा विचार न करता प्रशासकी य शुल्क घेण्यात २००२ पासुन सुरुवात केली.

तरी सुध्दा खाजगी रुग्णालयातुन येणारा कचरा नियमानुसार कॅटॅगिरीप्रमाणे ठरवुन दिलेल्या रंगाचे पिशवीतुन न येता पुर्वी प्रमाणेच मिश्रीतरीत्या येत होता.

त्यानंतर पिंपरी चिंचवड म.न.पाने या कामकाजासाठी बी.एम.डब्ल्यु (बायो मेडिकल (मॅनेजमेंट ॲन्ड हॅन्डलिंग वेस्ट) नियम १९९८ मध्ये नमुद केलेप्रमाणे कॉमन बायोमेडिकल वेस्ट ट्रिटमेंट फॅसिलिटी देणेसाठी (बी.ओ.टी. तत्वावर) निविदा मागविणेत आली होती. त्यानुसार सदरचे केंद्र म.न.पा.च्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे खाजगी करणाद्वारे मे. पास्को इनव्हायरमेंट सोल्युशन्स यांचे मार्फत चालविले जाते. त्या केंद्रास महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची मान्यता मिळाली आहे आणि त्या संस्थेने त्याचे व्यवस्थापन योग्यप्रकारे करीत असल्याने त्यांनी आय.एस.ओ. -९००१ व आय.एस.ओ. १४००० चे प्रमाण पत्र मिळाले आहे. जैव वैद्यकिय घनकचरा निर्मुलन ची माहिती पुढीलप्रमाणे

## *जैव वैद्यकिय घनकचरा निर्मुलन :-*

मनपाच्या वाय सी एम एच येथे बांधा - बाळगा- हस्तांतर (बी.ओ.टी.) या पध्दतीने सन २००५ मध्ये मे. पॅास्को इनव्हारमेंट सोल्युशन प्रा.लि. यांनी जैव वैद्यकिय घनकचरा निर्मुलनासाठी नविन इनसिनेटर, ऑटोक्लोव्ह, श्रेडर इत्यादी बसवले आहे. मनपा हद्दीमधुन २४७ हॉस्पीटल ( ८ पी.सी.एम सी. २ सरकारी, २३८ खाजगी) व ५० दवाखाने (१६ पी.सी.एम.सी., ३४ खाजगी) त्यांच्या इथे निर्माण होणारा जैव वैद्यकिय घनकचरा विघटन करण्यासाठी पाठवतात. दररोज सरासरी एकुण २३० कि.लो. कच-याचे विघटन करण्यात येते. मनपा हद्दीमध्ये एकुण १२०० ते १४०० संस्था जैव वैद्यकिय कचरा निर्माण करतात. पिवळ्या रंगाची पिशवी ही इनसिनेटर मध्ये टाकली जाते व लाल पिशवी ऑटोक्लोव्ह मध्ये टाकली जाते. इनसिनेरेटरचा कचरा साठवण्यासाठी वेगळी व्यवस्था केली आहे. ऑटोक्लोव्हचा कचरा साठविण्याची वेगळी व्यवस्था केली आहे. इनसिनेटर व ऑटोक्लेव्ह यांच्या तापमानाची नोंद होण्याची व्यवस्था मशीनमध्ये केली आहे. इनसिनेरेटरमध्ये कचरा जाळल्यानंतर उरणा-या राखेची विल्हेवाट नियमानुसार केली जाते. ऑटोक्लेव्ह व श्रेडींग केल्यानंतर तयार झालेल्या प्लॅस्टिकची नियमानुसार पुर्न:वापरासाठी पाठवणी केली जाते. या सर्व प्रक्रियेची मनपाने नेमणुक केलेल्या कमीटीव्दारे व महाराष्ट्र प्रदुषण मंडळ यांचेव्दारे वारंवार पहाणी केली जाते.

ज्या संस्था जैव वैद्यकिय कचरा निर्मुलनाच्या नियमांचे पालन करीत नसेल ती संस्था बंद करण्याचा संस्था प्रमुखास ५ वर्षाची सक्तमजुरी, तुरुंगवास व दंड करण्याचे अधिकार सुप्रिम कोर्ट, सी.पी.सी.बी व एम.पी.सी.बी. यांना आहेत. ज्या संस्थानी अजुनही रजिस्ट्रेशन केले नसेल अशा सर्वांनी समाज हीताकरीता व कायद्याचे पालन करण्याकरीता जैव वैद्यकिय घनकचरा निर्मुलनासाठी त्वरीत रजिस्ट्रेशन करून घ्यावे असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व संबंधिताना करीत आहे. या प्रकारचे रुग्णालयीन घनकचरा विल्हेवाट (बायो मेडिकल (मॅनेजमेंट ॲन्ड हॅन्डलिंग वेस्ट) नियम १९९६ आणि दुरुस्त नियम सप्टेंबर २००३ प्रमाणे लावण्यासाठी मनपाने बी.ओ. पध्दतीने अवलंब केल्यामुळे मनपाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक बचत तरी झालीच त्याशिवाय पर्यावरण समतोल/संरक्षण करण्यासाठी मदत झाली.

## *राडारोडा :-*

बांधकाम प्रक्रियेतुन निर्माण होणारा राडारोडा उदा. माती, सिंमेंट, वाळू, दगड, इत्यादी कच-याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी संबंधित बांधकाम करणा-याची आहे. अटीवर महानगरपालिका

बांधकामास परवानगी देते. तसेच सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर अनाधिकृतरीत्या राडारोडा टाकल्यास संबंधिताकडून प्रशासकिय शुल्क वसुल करण्यात येते. अशा प्रकारचा कचरा शक्यतो खड्डे भरुन काढण्याकरीता केला जातो.

महापालिका क्षेत्रातील घनकच-याचे पृथ:करण केले असता इनर्ट मटेरीयल (वाळू, माती इ.) वाढलेले असल्याचे निर्दशनास आले. यावरून असे स्पष्ट दीसते की शहरात मोठ्या प्रमाणावर बांधकामे होत आहे. शहरात अनेक ठिकाणी पहाणी केली असता नवीन इमारती बांधणे, जुन्या घरांची दुरूस्ती सतत चालु असल्याचे दिसते. त्यामुळे वाळू, माती, राडारोडा कच-यात मिसळला जातो. रस्त्यावर राडारोडा, डेब्रीस टाकण्यास प्रतिबंध करण्यासाठी महापालिकेच्या उपद्रव शोध पथकाने मोठ्या प्रमाणावर कारवाई केली असुन सन २००७-२००८ मध्ये १८२३० इसमांकडून र. रु. ९०,७४,३५०/- इतके प्रशासकिय शुल्क वसुल केले आहे.

## *७. व्यवस्थापन कार्यप्रणाली व जनजागरण.*

### *जनजागरण मोहीम :-*

विशेष साफसफाई मोहिम सुरु करून नागरीकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देण्याकरीता भित्तीपत्रके, कॅसेटव्दारे प्रसिध्दी, स्लाईड शो, सार्वजनिक ठिकाणी स्टीकर्स व घोषवाक्ये लिहून कोपरा उभा घेऊन, नागरीकामध्ये जनजागरण केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या समितीच्या शिफारसीनुसार स्वच्छता मोहिमेत नागरीकांचा सहभाग वाढविण्यासाठी व घनकचरा विषयांचे महत्व नागरीकांना पटण्यासाठी जनजागरण करण्यास सुचना दिल्या आहेत. त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने त्यांच्या भागात असणा-या सर्व स्तरावरील म्हणजे वैद्यकिय व्यवसाय करणारे, नगरसेवक, शिक्षक, वकील, दुकानदार, तरुण मंडळे इ. चे सहभागाने जनजागरणाचे काम केले जाते. प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेला प्रत्येक वॉर्डात समाजातील एका घटकाला अंकीत करून जनजागरण दिवस केला जातो. व त्यांचेमार्फत त्यांना ठरवून दिलेल्या भागात साफसफाई करून घेण्यात येते. सदर योजनेला नागरीकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे.

### *प्रशासकिय शुल्क वसूली :-*

सन २००५-०६ ते २००७-०८ (आरोग्य निरिक्षकांनी केलेली) आरोग्य निरीक्षकांना त्यांचे विभागात आरोग्य विघातक कृत्य करणा-या इसमांवर कायदेशीर कारवाई करणे त्यांचेकडून प्रशासकिय

शुल्क वसुल करणे इत्यादी अधिकार दिले आहेत. गेल्या ३ वर्षात त्यांनी केलेल्या कामगिरीची माहिती पुढील तक्त्यात दिली आहे.

| अ.क्र | प्रभागाचे नाव | २००५-२००६ | | २००६-२००७ | | २००७-२००८ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केसेस | रक्कम | केसेस | रक्कम | केसेस | रक्कम |
| १ | अ | २८६८ | ४,४१,६१० | ४२२७ | ९१३४७० | ३६१७ | १०,६९,४५०/- |
| २ | ब | १८२९ | २,२६,८१० | ४०१७ | ५५५९२७ | २२९९ | ४,५५,२४०/- |
| ३ | क | २५५८ | ३,१३,२९० | ३२८१ | ५५७३६५ | ३०६३ | ५,९८,१५०/- |
| ४ | ड | १०२२ | २,२१,३३५ | १६११ | २८७४१० | ९६० | २,२४,५७५/- |
| **एकुण** | | **८२७७** | **१२,०३,०४५** | **१३१३६** | **२३१४१७२** | **९९३९** | **२३,४७,४१५/-** |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्वच्छता मोहिमे अंतर्गत सर्व नागरीकांना स्वच्छतेचे महत्व व त्याबाबतच्या मार्गदर्शनपर सुचना देण्यात आल्या होत्या. नागरीकांनी त्यांचे घरांतून / व्यवसायातुन निर्माण झालेला कचरा रस्त्यावर न टाकता महानगरपालिकेमार्फत ठेवण्यात आलेल्या कचरा कुंडीतच टाकावा किंवा घंटागाडी ठेकेदाराकडे देण्यात यावा. उघड्यावर शौचास बसून रस्त्यावर व गल्ली बोळात घाण करुन नये. महानगरपालिकेने बांधलेल्या स्वच्छतागृहांचा वापर करणे तसेच प्रत्येक नागरीकाने त्यांचे सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे अशा सुचना दिलेल्या आहेत. आरोग्य निरिक्षकांकडे इतरही काम असल्याने परिसर स्वच्छतेबाबत परिणामकारक उपाययोजना करता यावी म्हणून महापालिकेने उपद्रव शोध पथकाची स्थापना केली त्यात मिलिटरी मधील रिटायर्ड कर्मचा-याची मानधनावर नियुक्ती केली व त्यांनाही आरोग्य निरिक्षकांप्रमाणेच आरोग्य विघातक कृत्य करणा-या इसमाविरुध्द कारवाईचे / प्रशासकिय शुल्क वसुलीचे अधिकार दिले. त्याची माहिती खालील तक्त्यात दर्शविली आहे.

### *उपद्रव शोध पथकामार्फत वसुल केलेल्या प्रशासकिय शुल्काची सन ०५-०६ ते ०७-०८*

| अक्र | प्रभागाचे नाव | २००५-२००६ | | २००६-२००७ | | २००७-२००८ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | केसेस | रक्कम | केसेस | रक्कम | केसेस | रक्कम |
| १ | अ | ४०९९ | ८६२४५० | ११३११ | ४१२३८५० | १८२३० | ९०७४३५० |
| २ | ब | ३९१० | ७९६०५० | सर्व प्रभागाच्या एकत्रित केसेस व रक्कम | | सर्व प्रभागाच्या एकत्रित केसेस व रक्कम | |
| ३ | क | ३७५२ | ७९५३०० | | | | |
| ४ | ड | ४०९९ | ८९३५०० | | | | |
| **एकुण** | | १५८६० | ३३४७३०० | ११३११ | ४१२३८५० | १८२३० | ९०७४३५० |

## *स्वच्छतेबाबतचा जाहीरनामा :-*

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहर स्वच्छतेबाबत अधिक दक्ष आहे. नागरिकांकडून येणाऱ्या आरोग्य विषयक तक्रारीची वेळेत दखल घेण्यासाठी महानगरपालिकेने जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. या जाहीरनाम्यात काम पुर्ण करण्याचा कालावधी, तक्रारी संदर्भात संपर्क साधावयाच्या अधिकाऱ्यांचे नाव व त्यांचे कार्यालय या बाबतची माहिति दिली. या जाहिरनाम्यातील तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचा तपशील | काम पुर्ण होण्याचा कालावधी | संपर्क अधिकारी व क्र.त्यांचे कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | रस्ते साफसफाई | सोमवार ते शनिवार स.७ ते ११ व दु. २ ते ५ व सुट्टीचे दिवशी स. ६ ते दु.१ (सर्व सुट्टी रविवार वगळून) | प्रभाग अधिकारी |
| २ | कचरा कुंडीतील कचरा हलविणे | सोमवार ते शनिवार स.८ ते दु. ४ (तक्रार असल्यास २४ तासाचे आत) | सहा. आरोग्याधिकारी |
| ३ | उघडी गटारे तुंबणे व भरुन वाहणे बाबतच्या | २४ तासाच्या आत | संबंधित आरोग्य निरिक्षक कार्यालय तक्रारी |
| ४ | उघडी गटारे दुरुस्ती | ७ दिवस | प्रभाग अभियंता |
| ५ | गटारातील साचलेला गाळ काढणे | ३ दिवस | संबंधित आरोग्य निरिक्षक |
| ६ | उघडे गटारांची मोठी विशेष दुरुस्ती | १ महिना | कार्यकारी अभियंता |

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य निरिक्षकांना मोबाईल फोन देण्यात आलेले आहेत व त्यांचे मोबाईल फोन नंबर दैनिकामध्ये प्रसिध्द करण्यात आले होते. स्वच्छते बाबतीत तक्रारी असल्यास नागरिक संबंधित आरोग्य निरीक्षकाशी संपर्क साधू शकतात. त्यामुळे आपल्या भागातील स्वच्छतेबाबतच्या तक्रारीसंबंधी ताबडतोब उपाययोजना करणे शक्य होते.

## *प्लॅस्टीक पिशव्या वापरबंदी*

महाराष्ट्र शासनाने माहे मार्च २००६ मध्ये अधिसुचनेव्दारे महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) अध्यादेश २००६ जारी केला असुन प्लॅस्टीक कॅरीबॅग्ज वापरा विरुध्द मनपाने मोहिम उघडली. जनजागरण मोहिमेव्दारे प्लॅस्टिक कॅरीबॅग्ज वापरावरील नियंत्रणाव्दारे नागरीकांस माहिती दिली. मनपाच्या उपद्रव शोध पथकामार्फत सन २००७-२००८ या वर्षात २११ व्यक्तींकडुन र. रु. २,५७,७००/- प्रशासकीय शुल्क वसुल केले.

## *माहिती प्रणाली :-*

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रत्येक आरोग्य निरिक्षकांकडून त्यांना ठरवून दिलेल्या वॉर्डातील हजेरी, उचलण्यात आलेल्या कचऱ्याचे प्रमाण, याकामी वापरण्यात आलेल्या वाहनांची संख्या इ. माहिती सहा. आरोग्याधिकारी यांचेकडे दिली जाते. तर सहा. आरोग्याधिकारी सर्व आरोग्य निरिक्षकांकडील माहिती एकत्रित करुन मा. आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचेकडे प्रतिदिनी पाठविली जाते.

## *८) घनकचरा व्यवस्थापन संदर्भात उपाययोजना -*

### *१) साफसफाई करणेबाबत सूचना :-*

अ) साफसफाई करण्यासाठी सध्या स्त्री कर्मचारी काम करीत असून त्याऐवजी पुरुष कर्मचाऱ्यांना साफसफाई करणेसाठी नेमणूक द्यावी. साफसफाई कर्मचाऱ्यांना लांब बांबू देवून त्याला झाडू (खराटा) लावून साफसफाई करणेची सुचना देवून तसे काम करून घेणेत येत आहे.

ब) सर्व साफसफाई कर्मचाऱ्यांना त्याच्या वैयक्तिक सुरक्षितेसाठी मास्क, हातमोजे, गमबुट इ. तत्सम कामाचे अनुषंगाने साहित्य साधने देवून त्याचा वापर करणे बंधनकारक करण्यात आला आहे.

क) नियमित आरोग्याची तपासणी करून घेणे त्या अनुषंगाने औषधोपचार करून घेणते येत आहे.

ड) प्रत्येक साफसफाई कर्मचाऱ्यांना हातगाडी उपलब्ध करुन देणे. झाडलोट किंवा साफसफाई केल्यानंतर एकत्रित जमा केलेला कचरा न जाळता फायबर ट्रॉली मधून त्यांना ठरवून दिलेल्या ठिकाणी कचरा टाकणे बाबत सूचना दिले आहे.

इ) अति गर्दीच्या ठिकाणी २ वेळा साफसफाई करणे. उदा. भाजी मंडई, चौक इत्यादी करण्यात येत आहे.

## *२) कचरा साठविणे / जमा करणेबाबत उपाययोजना :-*

१) प्रत्येक सोसायटी कॉम्प्लेक्स मध्ये सिमाभिंतीजवळ आतमध्ये ओला व सुका कचऱ्यासाठी दोन वेगवेगळ्या रंगाचे ड्रम्स ठेवणेकरिता सुचना देणे व मनपाच्या वतीने सदर कचरा उचलण्यासाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे तसे कार्यवाही चालु आहे.

२) कचरा साठविण्यासाठी कचरा कुंडी ठेवण्याच्या ठिकाण ठरवून त्यांना क्रमांक देणे. टिकाण ठरविताना कुंडीपासून वाहतुकीस अडचण होणार नाही. नागरिकांना सोईचे ठिकाण होईल परंतू यापासून जनावरांचा उपद्रव होणार नाही याची काळजी घेणे तसेच नागरिकांना इतर प्रकारचा उपद्रव होणार नाही याची काळजी घेण्यात येणार आहे.

३) कचरा कुंडीची क्षमता प्रत्येक ठिकाणी अंदाजे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची माहिती संबंधित कर्मचाऱ्याकडून घेऊन त्या अनुषंगाने त्या क्षमतेच्या कचराकुंडीची ठिकाणी व्यवस्था करणे ज्या ठिकाणी उघड्यावर कचरा टाकला जातो अशी ठिकाणे शोधून त्या ठिकाणी कचरा कुंडयाची व्यवस्था करणेत येत आहे.

४) सध्या असलेल्या कुंडीच्या प्रकारामध्ये बदल करणेत आले आहे. उदा. कचरा कुंडीना झाकण असलेल्या कचराकुंडी उपलब्ध करुन दिली आहे. पावसाळ्यात सद्याच्या कचराकुंडींना झाकण नसल्यामुळे त्यापासून उपद्रव होतो. कचराकुंड्या उघड्या असल्याने जनावरांचा / माशांचा उपद्रव होतो सर्व कचरा एकत्रित जमा केला जातो. त्यामध्ये ओला कचरा सुका कचरा वेगवेगळ्या साठविण्याची सुविधा उपलब्ध नाही. अशी सुविधा असणारी कचराकुंडी उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

फिशमार्केट, भाजी मार्केट मध्ये प्रत्येक दुकानदाराला त्याच्या वतीनेच झाकण असलेले कचराकुंड्या ठेवण्याची सक्ती करावी.त्याशिवाय सर्व किराणा, दुकानदार, पानस्टॉल, बेकरी, हॉटेल्स व इतर दुकाने यांना सुध्दा कचरा साठविणेसाठी कचराकुंड्या ठेवण्याबाबत सुचना देणेत आले आहे व त्यांचे

घरातून / व्यवसायामधुन निर्माण झालेला ओला व सुका कचरा स्वतंत्रपणे साठवून ठेवण्याच्या सूचना देणेत येणार आहे. भाजीमंडई येथे मोठ्या क्षमतेचे झाकण असलेली कचराकुंडी ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे.

वरील सर्व ठिकाणी जमा केलेला कचरा गोळा करणेकामी घंटागाडी किंवा इतर कर्मचारी नेमून देणेत येणार आहे व त्यांना ओला व सुका कचरा गोळा करणेबाबत सूचना देणेत येतील. एस.टी.स्टॅन्ड व रेल्वेस्टेशन या ठिकाणी स्वच्छतेची स्थिती अत्यंत दयनीय असते. सदर ठिकाणे जरी म.न.पा. च्या अखत्यारित येत नसली तरी म.न.पा. च्या हद्दीत येत असल्याने तेथील कचरा गोळा करणे बाबतची सुचना संबंधितांना देण्यात आली आहे व सुचनेप्रमाणे कार्यवाही न केलेल्या संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. सध्या असलेल्या कमर्शियल कॉम्प्लेक्समध्ये सुध्दा वाईट परिस्थिती असून तेथील साफसफाई करून कचरा गोळा करणेबाबत कॉम्प्लेक्स मालकास किंवा वसाहतीच्या पदाधिकाऱ्यांना सूचना देण्यात याव्यात. घरोघरी सध्या केमिकलचासुध्दा वापर होत असतो. त्यांना केमिकल, बॅटरी, ओला सुका कचरा स्वतंत्ररीत्या संकलित करणेबाबत सूचना देण्यात येणार आहे व याबाबत सुचना देऊन जनजागरण मोहिम हाती घेणे आवश्यक आहे.

५) झोपडपट्टी परिसरात लहान मुले उघड्यावर शौच करीत असलेल्या अनेक ठिकाणी दिसून येते. यामुळे अशा ठिकाणी साफसफाई करणे अडचणीचे व अवघड होते त्यासाठी लहानमुलांसाठी संडासब्लॉक तयार करणे, अशा ठिकाणचे सर्वेक्षण करून त्या ठिकाणी लहान मुलांसाठी संडास, मुताऱ्या बांधण्यात याव्या व त्याचा वापर करणे सक्तीचे करण्यात येणार आहे. यामुळे झोपडपट्टी परिसर स्वच्छ राहण्यास मदत होते. तसेच झोपडपट्टीत अस्तित्वात असलेल्या मंडळांना एकत्रित करून तेथे एक महामंडळ तयार करून त्यांचेकडे सदरचे झोपडपट्टी येथील साफसफाईची जबाबदारी देण्यात यावी असा विचार आहे.

६) झोपडपट्टी ठिकाणी गटाराची स्थिती अत्यंत दयनीय आहे. गटर्सचा वापर कचरा टाकण्यासाठी करीत असलेला दिसून येतो. गटरमध्ये कचरा टाकत असल्याने गटर तुंबून रहाते त्यामुळे तेथे डासोत्पत्तीस्थाने निर्माण झालेली आहेत. नियमित गटर्स साफ करणे आवश्यक आहे व नागरिकांमध्ये याबद्दल बैठका घेऊन जनजागरण करणे आवश्यक आहे. तसेच गटर अनेक ठिकाणी फुटलेले दिसून येते अनेक ठिकाणी गटर्सचे बांधकाम पुर्ण झालेले दिसून येत नाही तरी हे काम तातडीने करण्याची गरज आहे तसेच याबाबत सर्व माहिती संबंधित खात्यास ठेवणे आवश्यक आहे.

## *कचरा वाहतुकींसंदर्भात उपाययोजना :-*

१) पिंपरी चिंचवड शहराची जवाहरलाल नेहरू नागरी पुनरुत्थान अभियानांतर्गत निवड करण्यात आली असुन त्यानुसार सी.डी.पी. (सिटी डेव्हलपमेंट प्लॅन) तयार करण्यात आला व त्यानुसार आधुनिकीकरणासाठी निरनिराळ्या विभागांचे डी.पी.आर..(डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट) तयार करण्याचे काम हाती घेतले.

२) घनकचरा व्यवस्थापनांतर्गत कचरा गोळा करणे, साठवणुक, वाहतुक, विल्हेवाट या प्रकल्पाचा र रु ४२.८० कोटी रुपयांचा डी.पी.आर. केंद्रशासनाने मंजूर केला असुन त्याचे अनुदानापोटी र रु ७,४२,१३,०००/- इतकी रक्कम प्राप्त झाली आहे.

३) त्यानुसार घनकचरा व्यवस्थापनासाठी यांत्रिकी पध्दतीची साधने, उपकरणे उदा १) ट्रक माउंटेड रोड स्वीपर्स २) ट्रॅक्टर माउंटेड रोड स्वीपर्स ३) कॉम्पॅक्टर्स इ खरेदी करण्यात आले आहे.

४) प्रत्येक प्रकारचा कचरा वाहतुकीला मार्ग ठरवून देणे आवश्यक आहे. इंधन वाया जाऊ नये म्हणून कचरा वाहतुक सुरळित व्हावी म्हणून ट्रान्सफर स्टेशन भोसरी एम.आय.डी.सी. मध्ये बांधले आहे. त्याच धर्तीवर प्रभागनिहाय प्रत्येकी एक ट्रान्सफर स्टेशन होणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही सुध्दा चालू आहे त्याला गती देवून प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्यात येतील व कचरा वाहनाची वाहतुकीचे मार्ग ठरविणेत येईल.

५) कचरा वाहतूक रस्त्याच्या वर्दळीच्या वेळात करण्यात येऊ नये. शहरातील गर्दीच्या ठिकाणी रात्री सफाईची कामे करणेत येतील.

६) भाजी मंडई व हॉटेल्स मधील कचरा नेण्यासाठी जशी स्वतंत्र वाहतुक व्यवस्था आहे. तशीच स्वतंत्र व्यवस्था मंगलकार्यालयातील कचरा वाहतुकीकरिता (सिझनल) करणे आवश्यक आहे. सध्याची कामाची वेळी ७-०० ते २-०० अथवा ३-०० आहे ती ६-०० ते १-०० दोन समान काम करणे.

७) भाजी मंडई, हॉटेल, औद्योगिक घनकचरा व मंगलकार्यालयातील कचरा इ. वाहतुकीचा खर्च संबंधिताकडून प्रशासकीय कर म्हणून करणे आवश्यक आहे.

## *कचरा विल्हेवाट संदर्भात उपाययोजना :-*

१) कचरा विल्हेवाटीच्या ठिकाणी (कचरा डेपो) कचरा वर्गीकरण करणेसह काही चिंधी वेचणाऱ्यांची नोंदणी करून घेणे आवश्यक आहे म्हणुन पिंपरी चिंचवड म.न.पाचे प्रशासनाने कागद काच पत्रा संघटनेची पदाधिकारी समवेत बैठक घेऊन म.न.पास एकुण ४० वॉर्ड मधला कचरा गोळा करण्याकरिता एकुण ५१२ चिंधी वेचनाऱ्यांची यादी केली आहे. त्यांना म.न.पा.चे ओळखपत्र देणार असुन प्रत्येकाना घराची संख्या ठिकाण ठरवुन देणार आहे. प्रत्येकाना जवळ जवळ ३००

कुटुंबातुन ओले व सुका कचरा विघटन रित्या गोळा करण्यासाठी सुचना दिली आहे व एकत्रित झालेल्या अलगीकरण करण्यासाठी एकुण २० ठिकाणी जागा निश्चित करण्यात आले आहे. याकामी त्यांना म.न.पाचे वतीने स्वत:चे संरक्षणासाठी मास्क, टोपी, ॲप्रन, साडी, ड्रेस, बुट, हातमौजे, बादली, हातकार्ड, ट्रॉली, तीन चाकी सायकल देणार आहे. त्यांच्या आरोग्यासाठी म.न.पा.च्या रूग्णालयात मोफत औषधोपचार देण्याचा विचार आहे.

२) कचरा डेपो गेट जवळ कर्मचारी २४ तास राहणेकरीता कर्मचारी निवासस्थान बांधणेचे नियोजन आहे.

३) प्राप्त झालेल्या कचऱ्याची माहिती अद्ययावत रजिस्टरमध्ये नोंदविणे कार्यवाही करणार आहे.

४) वेगवेगळ्या प्रकारचा कचरा स्वतंत्रपणे विल्हेवाट लावण्याकरीता स्थानके ठरवून देणार आहे.

५) कचरा टाकल्यावर त्यावर ताबडतोब माती किंवा मुरुन टाकून बुलडोझरने दाबणेचे काम करण्यात येत आहे.

६) कचरा डेपोमधील कचऱ्यामध्ये असणाऱ्या रासायनिक व सुक्ष्माणु जीवापासून माती प्रदुषण व भुजल प्रदुषण होऊ नये म्हणून खबरदारी घेण्यात येणार आहे.

७) दरवर्षी कचऱ्याचे पृथ:करण करून घेणार आहे.

८) कचऱ्यापासून उर्जा निर्मिती करण्याचा प्रकल्पाची कार्यवाही बांधा वापरा व हस्तांतरित करा या पध्दतीने तातडीने करणेचा विचार आहे.

९) पिंपरी चिंचवड औद्योगिक शहर असल्याने या ठिकाणी उद्योगधंद्यापासून निर्माण होणाऱ्या रासायनिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरीता जागेचे निश्चितीकरण करणे आवश्यक आहे. अन्यथा काही छोटे-मोठे कारखानदार त्यांच्या कंपनीच्या वस्तुनिर्मितीच्या ओघात निर्माण होणारा रासायनिक कचरा मोकळ्या जागेवर इकडे - तिकडे टाकून मृदा प्रदुषण आणि जलप्रदुषण करण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणुन त्यांचेसाठी एक प्रकल्प राबविणेचा विचार आहे.

१०) सध्या रूग्णालयीन कचऱ्याच्या विल्हेवाटीचे काम पास्को या खाजगी कंपनीस दिले आहे.

११) मनपा हद्दीमध्ये अनेक खाणी असून खाणीचा वापर कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी करता येईल का याचा विचार करणेत येतील.

१२) कचरा डेपो येथे पुढीलप्रमाणे सुधारणा करणे.

अ) सिमा भिंतीचे काम ६०टक्के झाले असून उर्वरित काम पूर्ण करणे.

ब) कचरा डेपोवरील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करून पुर्ण करणे.